# प्रकरण तीन

## ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

**3.446 लेखा परीक्षण अभिलेखे व मोजमाप पुस्तिका संचिका सादर न केलेबाबत.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद ठाणे येथील सन 2014-15 च्या लेखापरीक्षणात अभिलेखे सादर न केल्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

ग्रामिण पाणीपुरवठा विभागाच्या लेखापरीक्षणात विभागाच्या अधिनस्त असलेल्या 8 तालुक्यातील विकासकामे, अपूर्ण विकासकामाच्या नस्ती, मोजमाप पुस्तिका, साठा नोंदवही, या कार्यालयाकडील अर्धसमास पत्र क्रमांक 1, दिनांक 21/12/2015 ने मागणी केली असता विभागाकडून अभिलेखे उपलब्ध करून देणेबाबत 8/10 दिवसांची मुदत देऊनही तसेच या कार्यालयातील लेखापरीक्षण शिबिरातून अर्धसमास पत्र क्रमांक 1 ते 12 देऊनही लेखापरीक्षणास दप्तर सादर झाले नाही. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम (सुधारीत) 1930 चे कलम 6 अन्वये लेखा परीक्षणास विहीत अभिलेखे सादर करणे आवश्यक असताना लेखे सादर न करणे, सादर करण्यास टाळाटाळ करण्याचा हेतू निदर्शनास आला आहे तरी याबाबत योग्य ती कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**3.447 मौजे थळ तालुका अलिबाग येथील मौजे श्रीनगर डोंगरी ते मयेकर डोंगरी येथील पाईप लाईन नुतनीकरण करणे.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** जिल्हा परिषद सेस मधून थळ येथील मौजे श्रीनगर डोंगरी ते मयेकर डोंगरी येथील पाईप लाईन नुतनीकरण करणे या कामावर रक्कम रूपये 4,94,231/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 146(1) नुसार कार्यादेश देणे पुर्वी मक्तेदाराकडून करारनामा करून व नियम 148(2) अन्वये करारातील अटी शर्तीचा भंग झाल्यास दंडात्मक कार्यवाहीची तरतुद करारनाम्यात करण्यात यावी परंतू अशी पध्दत अवलंबविण्यात आलेली नाही.

2) लेखासंहिता 1968 चे नियम क्र.120(2) प्रमाणे कामातील एखादया बाबीवर होणारी बचत ही इतर बाबीवर खर्च करता येत नाही. तथापि सदर कामामध्ये बचतीची रक्कम इतर कामावर खर्च केल्याचे दिसून येते.

3) शासन परिपत्रक क्रमांक जी.आर.34/सा-4/599, दिनांक 08/01/2007 नुसार कामासाठी वापरलेले साहित्य प्रयोग शाळेतून तपासणी केली नाही, पाईप खरेदी बिले जोडलेले नाहीत.

4) कामाच्या ठिकाणी 5X4 फुटाचे लोखंडी नाम फलक लावला नाही. सदर कामाचे फोटो नस्ती सोबत जोडलेले नाहीत.

5) सदर कामाच्या सिमेंट वापर प्रमाणपत्रानुसार एकूण 5 गोणी सिमेंट वापरणे आवश्यक होते असे असतांना सदर सिमेंट वापर प्रमाणपत्रावर खाडाखोड करून 48 गोणी सिमेंट असे करण्यात आले आहे.

**3.448 सासवणे कोळीवाडा अंतर्गत नळपाणी पुरवठा योजना करणेबाबत.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** जिल्हा परिषद कडील पाणी पुरवठा विभागाने जिल्हा परिषद सेस मधून सासवणे कोळीवाडा अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजना तयार करणेसाठी रूपये 9,98,654/- खर्च करण्यात आलेला आहे, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 146(1) नुसार कार्यादेश देणे पुर्वी मक्तेदाराकडून करारनामा करून व नियम 148(2) अन्वये करारातील अटी शर्तीचा भंग झाल्यास दंडात्मक कार्यवाहीची तरतुद करारनाम्यात करण्यात यावी परंतू अशी पध्दत अवलंबविण्यात आलेली नाही.

2) पाईप खरेदी बिले जोडलेली नाही, सदरचे काम इतर योजनेतून हाती घेतलेले नाही, त्याबाबत प्रमाणपत्र सोबत जोडलेले नाही, चाचणी अहवाल, साहित्य, दिनांक नमुद नाही.

3) सार्वजनिक बांधकाम विभाग नियम पुस्तीका 1984 मधील नियम 296(ब) नुसार जानेवारी ते मार्च दरम्यान काम सुरू करणेचे आदेश देऊ नये असे असतांना कामाचे आदेश देण्यात आले आहेत. सदरचे काम पुर्ण झाले बाबत 5X4 फुटाचा लोखंडी फलक लावलेला नाही. कामाच्या फोटो मध्ये सदर कामाचा उल्लेख असलेला बोर्ड दिसून येत नाही.

4) सदर कामासाठी सिमेंट खरेदी करण्यात आलेल्या पावतीवर दिनांक 05/05/2015 नमुद करण्यात आली आहे. परंतू सदर काम दिनांक 19/5/2014 रोजी पुर्ण झालेले असतांना दिनांक 05/05/2015 रोजी सिमेंट खरेदी करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

### 3.449 ढोलपाडा येथे उंच साठवण टाकीची गळती थांबविणे.

**जिल्हा परिषद रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 19)** - जिल्हा परिषद कडील पाणी पुरवठा विभागाचे जिल्हा परिषद सेस मधून ढोलपाडा येथील उंच साठवण टाकीची गळती थांबविणे कामासाठी रक्कम रूपये 4,44,298/- खर्च करणेत आलेला आहे, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 146(1) नुसार कार्यादेश देणे पुर्वी मक्तेदाराकडून करारनामा करून व नियम 148(2) अन्वये करारातील अटी शर्तीचा भंग झाल्यास दंडात्मक कार्यवाहीची तरतुद करारनाम्यात करण्यात यावी परंतू अशी पध्दत अवलंबिण्यात आलेली नाही.

2) कामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याची शासन परीपत्रक क्र.जी.आर.-34/4/सा.4/ 5999 दिनांक 08/01/2007 नुसार प्रयोग शाळेतून तपासणी करण्यता आली नाही.

3) नस्तीसोबत कामाचे फोटो नाही. सिमेंट वापराबाबत सिमेंटची पावती नाही.

4) सदर काम पुर्ण करण्यासाठी 6 महिन्याचा कालावधी असतांना केवळ 13 दिवसात काम पुर्ण केले आहे, त्यामूळे कामाचा तांत्रिक दर्जा योग्य असल्याची खात्री देता येत नाही.

5) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील परिपत्रक दिनांक 08/06/2009 अन्वये कामाच्या ठिकाणी 5x4 फुटाचा लोखंडी नाम फलक लावणे आवश्यक आहे, परंतू त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

### 3.450 शिंगढोल, तालुका कर्जत येथील तलावातील गाळ काढणे व खोलीकरण करणे.

**जिल्हा परिषद रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 22)** - जिल्हा परिषद कडील पाणी पुरवठा विभागाने जिल्हा परिषद सेस मधून शिंगढोल, तालुका कर्जत येथील तलावातील गाळ काढणे व खोलीकरण करणे या कामावर रक्कम रूपये 2,46,833/- इतका खर्च करणेत आलेला आहे, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) तलावातील गाळ यापुर्वी केव्हा काढण्यात आला होता, खोलीकरण केव्हा केले होते, याबाबत कागदपत्र नस्तीसोबत नाहीत.

2) काम इतर कोणत्याही निधीतून मंजूर नसल्याची कागदपत्रे नाहीत.

3) लेखासंहिता 1968 चे नियम 197 प्रमाणे नमुना नंबर 69 मध्ये पुर्ण कामाच्या नोंदी घेतल्या नाहीत.

4) नियम 147 प्रमाणे करारनामे नमुना नंबर 48 मध्ये ठेवले नाहीत.

5) लेखासंहिता 1968 चे नियम 146 नुसार करारनामा करतांना त्यातील अटी व शर्ती व शर्तीचा उल्लेख करारनाम्यात करणे बंधनकारक असतांना तसे केले नाही.

6) नियम 157 प्रमाणे कंत्राटदाराची नोंदवही नमूना नंबर 49 मध्ये ठेवली नाही.

7) स्थावर मालमत्ता नोंदवहीत नोंदी घेतल्या नाहीत.

8) शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग स्था.नि.आ./2003/ प्र.क्र. 369 / का/1441 दिनांक 18/11/2003 नुसार कामाचे ठिकाणी कामाचे नाम फलक लावणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 64 व 67 प्रमाणे नमुना नंबर 22 व 23 मध्ये नोंदवहया ठेवल्या नाही.

10) तलावाचे गाळ काढून खोलीकरण केल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र तपासणीस नस्तीत आढळून आले नाही.

**3.451 पोयनाड पोलीस स्टेशन ते ग्रामपंचायत कार्यालय पोयनाड पर्यंत पाईप लाईन टाकणे.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 23)** - जिल्हा परिषद कडील पाणी पुरवठा विभागाने जिल्हा परिषद सेस मधून पोयनाड पोलीस स्टेशन ते ग्रामपंचायत कार्यालय पोयनाड पर्यंत पाईप लाईन टाकणे, य कामावर रक्कम रूपये 9,45,998/- इतका खर्च करण्यात आला आहे, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ठेकेदाराचे मुदतवाढीचे पत्र नस्तीस उपलब्ध नाही.

2) पाईप खरेदीचे गुणवत्ता प्रमाणपत्र उपलब्ध नाही. सदर काम इतर निधीतून मंजूर न झाल्याबाबतचे प्रमाणपत्र नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 197 प्रमाणे व नमुना नंबर 69 मध्ये पुर्ण कामाच्या नोंदी घेतल्या नाहीत, नियम 147 प्रमाणे करारनामे नमुना नंबर 48 मध्ये ठेवले नाही. नियम 146 नुसार अटी व शर्तीचा उल्लेख करारनाम्यात केल्याचे दिसून आले नाही.नियम 157 नुसार कंत्राटदाराची नोंदवही नमुना नंबर 49 मध्ये ठेवली नाही. नियम 97 प्रमाणे नमुना नंबर 39 मध्ये स्थावर मालमत्तेच्या नोंदी घेतल्या नाहीत. नमुना नंबर 22 व 23 मध्ये विहीत नमुन्यातील नोंदवहया ठेवल्या नाहीत.

4) शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग स्था.नि.आ.2003/प्र.क्र.369/का/ 1445 दिनांक 19/11/2003 नुसार कामाच्या ठिकाणी नामफलक लावणे बंधनकारक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

5) सिमेंट वापर तक्ता बिलासोबत जोडला नाही.

6) महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्र.1208/प्र.क्र.3/का/1412/दिनांक 17/01/2008 चे परिच्छेद 17 नुसार सदर काम इतर कोणत्याही निधीतून प्रस्तावित नसल्याची आवश्यक कागदपत्रांअभावी खात्री करता आली नाही.

7) बाब क्र.3 प्रमाणे 40 mm Valve मार्केट दराने खरेदी केल्याचे अंदाजपत्रकावरून निदर्शनास येते, परंतू सदर 3 Valve खरेदीचे दरपत्रके नस्तीत तपासणीस उपलब्ध झाले नाही.

8) तांत्रीक मान्यता आदेशावर कार्यकारी अभीयंता यांची स्वाक्षरी आहे, परंतू त्यावर कामाचे नांव, क्रमांक व दिनांक नमुद नाही.

**3.452 मौजे उक्रूळ गांव, तालुका कर्जत तलाव सुधारणा करणे.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 51) -** जिल्हा परिषद कडील पाणी पुरवठा विभागाने जिल्हा परिषद सेस मधून मौजे उक्रूळ गांव तलाव सुधारणा करणे या कामावर रक्कम रूपये 17,95,860/- एवढा खर्च करणेंत आलेला आहे, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रशासकीय मंजूरी आदेशावर अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद रायगड यांची स्वाक्षरी नाही. उक्रूळ गांव तलावाचे काम यापुर्वी केव्हा केले होते, त्याचे कागदपत्रे नस्तीस उपलब्ध नाही.

2) महाराष्ट्र शासन नियोजन विभाग शासन निर्णय मटेम-1208/प्र.क्र.30/का/1412, दिनांक 17/01/2008 चे परिच्छेद 17 नुसार सदरचे काम इतर कोणत्याही निधीतून न झालेबाबतचे कागदपत्र नस्तीसोबत जोडले नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 197 प्रमाणे नमुना नंबर 69 मध्ये पुर्ण कामाच्या नोंदी घेतल्या नाहीत, नियम 147 नुसार करारनाम्याचे नमुना नंबर 48 मध्ये नोंदी ठेवल्या नाहीत, नियम 146 नुसार करारनामा करतांना अटी शर्तीचा उल्लेख करण्यात आला नाही, नियम 157 प्रमाणे कंत्राटदाराची नोंदवही नमुना नंबर 49 मध्ये ठेवण्यात आली नाही, नियम 64 व 67 प्रमाणे नमुना नंबर 22 व 23 मध्ये इतर नोंदवहया ठेवण्यात आल्या नाहीत.

4) शासन निर्णय ग्रामविकास विभाग स्था.नि.आ.2003/प्र.क्र.369/का/1445, दिनांक 19/11/2003 नुसार कामाच्या ठिकाणी नामफलक लावणे बंधनकारक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

5) तलावाची सुधारणा केल्यानंतर 10 टक्के रक्कम देखभाल दुरूस्तीसाठी राखून ठेवली नाही.

6) एक्सेस/सेव्हींग स्टेटमेंट चे अवलोकन केले असता काही बाबींवर 10% पेक्षा जास्त फरक पडल्याने, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 167(2) प्रमाणे सुधारीत प्राकलन करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

**3.453 पोमेंडी खुर्द, काजरघाटी, बौध्दवाडी पाणीपुरवठा योजना करणे. (आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम सन 2014-2015)**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने सन 2014-2015 या आर्थिक वर्षात पोमेंडी खुर्द काजरघाटी बौध्दवाडी पाणीपुरवठा योजना करणे यावर प्रमाणक क्रमांक 181, दिनांक 31/03/2015 अन्वये रक्कम रुपये 3,63,226/- व प्रमाणक क्रमांक 131, दिनांक 31/03/2015 अन्वये रक्कम रुपये 48,495/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाचे जाहिरात प्रसिध्दीची वर्तमानपत्राची प्रत कामाच्या पंजिकेत जोडलेली नाही.

2) निविदाधारक श्रीम. निलम सदाशिव चवेकर यांचे मुदतबाह्य नोंदणी प्रमाणपत्र असतांना त्यांची निविदा स्विकारण्यात आलेली आहे.

3) मक्तेदार श्री.विशाल जयवंत शिंदे हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडे वर्ग-3 चे नोंदणीकृत ठेकेदार असून जिल्हा परिषदेकडील सुशिक्षित बेरोजगार नोंदणीकृत अभियंता नाहीत. त्यामुळे इसारा रक्कम रुपये 4,570/- निविदेसोबत व करारनामा करतेवेळी घेणे आवश्यक असतांना त्यांच्या देयकातून 2 टक्के सुरक्षा अनामत घेण्यात आली आहे.

4) ठेकेदार यांच्याशी करारनामा न करतांच कामाचा कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे.

5) ठेकेदार श्री.विशाल जयवंत शिंदे यांच्या देयकातून 2 टक्के विक्रीकराची रक्कम रुपये 8,235/- कपात करण्यात आलेली आहे. त्याबाबत निविदेसोबत ठेकेदार यांनी महालक्ष्मी एजन्सीचे व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र जोडलेले आहे. (व्हॅट नंबर VATTIN-2727004669V दिनांक एप्रिल 2006) तरी संबंधित ठेकेदार यांच्या वैयक्तिक नावे सदरची व्हॅट नोंदणी नाही. तरी 3 टक्के कमी कपात रक्कम रुपये 12,352/- संबंधिताकडून वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

6) कामाची मुदत संपण्यापूर्वी 15 दिवस अगोदर म्हणजेच दिनांक 20/05/2014 रोजी मुदतवाढीसाठी अर्ज करणे आवश्यक असतांना तो एक महिना नंतर म्हणजेच दिनांक 30/07/2014 रोजी केलेला आहे, व विना दंड मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

**3.454 धामापूर बौध्दवाडी येथील विजय धामापूरकर यांच्या शेजारील सार्वजनिक विहीरीवरुन पाईप लाईन टाकणे.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** कामाची नस्ती तपासली असता खालील आक्षेप उपस्थित करण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक निविदा-2012/प्रक्र97परा-7, दिनांक 30/01/2014 नुसार रुपये 5 लाख ते 50 लाख निविदेची किंमत असल्यास निविदा सूचनेचा कालावधी किमान 7 दिवस आहे. सदर कामाची निविदा किंमत रुपये 7,48,929/- असताना निविदा कालावधी 27/02/2014 ते 03/3/2014 असा एकूण 5 दिवस दिला आहे. त्यामुळे निविदा मुदत दोन दिवसाने का कमी करण्यात आली?

2) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक निविदा-2014 प्र.क्र.164/परा-7, दिनांक 15/07/2014 नुसार निविदाकाराला जिल्हा परिषदेच्या कार्यालयास भेट देण्याची आवश्यकता राहू नये. यासाठी ई-निविदा कार्यप्रणाली अंतर्गत निविदा फी व इसारा रक्कम स्विकारणे निर्देशित केले असताना सदर कामाची ई निविदा प्रक्रिया करताना निविदा फी रक्कम रुपये 200/- ऑनलाईन स्विकारलेली नाही.

3) बयाणा रक्कम घेतलेली नाही. सदर निविदा रद्द करुन मुदतवाढ देवून निविदा मागविणे आवश्यक होते.

4) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कोकण विभाग दरसूचीमधील सूचनेनुसार मक्तेदाराने पाईप किंवा पुरवठा व व्हॉल्व पुरवठा केल्यास साहित्य पुरवठा केल्यावर 85 टक्के देयकाचे प्रदान व समाधानकारक हैड्रोलिक चाचणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर 15 टक्के देयकाचे प्रदान करणे आवश्यक आहे. सदर कामावर रुपये 1,25,295/- किंमतीचे पाईप व व्हाल्व यांचा वापर केला आहे. परंतु हैड्रोलिक चाचणी प्रमाणपत्र नसताना पूर्ण देयकाचे प्रदान कसे काय केले.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 148 व निविदा खंड 6 नुसार कामाची मुदत संपण्यापूर्वी 15 दिवस अगोदर मक्तेदाराने मुदत वाढ सादर करणे बंधनकारक असताना सदर कामाची मुदत दिनांक 31/03/2014 रोजी संपली असताना मक्तेदाराने मुदतवाढ अर्ज दिनांक 20/03/2015 रोजी म्हणजे 12 महिने विलंबाने सादर केला आहे. मुदतवाढ दिलेली आहे. परंतु दंडाची आकारणी केलेली नाही. तरी दंडाची रक्कम वसुल करण्यात यावी.

6) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक ग्रा.पा.पु.1090/सी आर-163 दिनांक 07/12/1990 चे सहपत्र परिशिष्ट-2 मध्ये तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जिल्हा दरसूची पृष्ठ क्रमांक 7 मध्ये डोंगरी विभागाचे क्षेत्र दर्शविले आहे. नमुद क्षेत्रासाठी 10 टक्के वाढीव तरतुद आहे. परंतु सदर डोंगरी क्षेत्रामध्ये धामापूर नसताना 10 टक्के वाढीव दर आदा केला आहे. उपरोक्त जादा दराने अतिप्रदान झालेली रक्कम 7,287/- संबंधितांकडून वसुल करुन शासन सदरी भरणा करावी.

**3.455 बाव गावळवाडी नळपाणी पुरवठा योजना दुरुस्त करणे. ता. कुडाळ, जिल्हा परिषद योजना.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** उपरोक्त कामाची नस्ती तपासली असता खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाच्या अंदाजपत्रकासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कडील सन 2012-13 ची दरसूचीचे दर वापरण्यात आले आहेत. कामाची मोजमाप नोंदवही तपासली असता कामावर 63MM pvc pipe-6kg चे परिमाण 342 वापरले आहे. दरसूचीतील दर 96.80 आहे. प्रत्यक्षात दिलेला दर 108.09 आहे. त्यातील फरक 12.10 X 342 = 4138/- इतकी रक्कम अतीप्रदान केलेली आहे. अतीप्रदान रक्कम रुपये 4,138/- संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन वसुल करावी व निधीत भरणा करावी.

2) कामाची मुदत कार्यारंभ आदेशाप्रमाणे 31/03/2014 पर्यंत होती. मक्तेदार यांनी मुदतवाढ मागणी अर्ज दिनांक 31/03/2015 ला सादर केला. मुदतवाढ दिनांक 31/03/2015 पर्यंत देण्यात आली. कामासाठी 326 दिवस विलंब झाला. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1969 चे नियम 148, 149 व निविदेतील खंड 2 नुसार मुदत संपण्यापूर्वी 15 दिवस अगोदर मक्तेदाराने अर्ज करणे आवश्यक होते. परंतु तशी कार्यवाही मक्तेदाराने केलेली नाही. तरी दंडाची परिगणना करुन दंड मक्तेदाराकडून वसुल करुन चलनासह पुर्तता दाखवावी.

3) नस्तीसोबत ग्रामपंचायतीकडील कागदपत्र जोडलेली नाहीत. त्यामध्ये नं. 3 व 4 (2) कॅशबुक उतारा (3) उत्पन्नाचा दाखला (4) काम मुदतीत पूर्ण करण्यास तयार असलेबाबत दाखला नाही. (5) यंत्र सामग्री उपबब्ध असल्याचा दाखला नाही. (6) काम अन्य योजनेत प्रस्तावित नसल्याचा दाखला नाही (7) अंदाजपत्रकापेक्षा जादा खर्च करण्यास तयार असल्याबाबत दाखला नाही. (8) निधी दिनांक 31/03/2014 पर्यंत खर्च करणे असे आदेश असताना खर्च त्याच वर्षात का करण्यात आला नाही?

**3.456 ब्लास्टिंग युनिट वेतनावर झालेल्या खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे सन 2014-2015 चे लेखापरीक्षणात ब्लास्टिंग युनिट वेतनावर एकूण रुपये 29,31,775/- ऐवढा खर्च झाल्याचे आढळुन आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 च्या कलम 100 प्रमाणे विंधन विहीरी कार्यक्रम व "वायू संपादीक पथक" ब्लास्टींक युनिटसह जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करण्यांत आला आहे. सदर

ब्लास्टीक युनिट कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते यावर रुपये 29,31,775/- एवढा खर्च करण्यांत आला आहे. सन 2014-2015 मध्ये या युनिटला "5000 होलचे" उदिदष्ट देण्यांत आलेले होते. परंतु मागणी नसल्यामुळे एकही होलचे उदिदष्ट साध्य होवू शकले नाही.

शासनाने ज्या उदेशाने ही योजना सुरु ठेवली आहे. त्याची मागणी नसल्यामुळे या योजनेमध्ये काहीही काम झालेले नाही व यामध्ये शासनाचा मुळ उदेश साध्य् न होता वेतनावर झालेला खर्च रुपये 29,31,775/- हा निरर्थक असल्याचे दिसून येते.

तरी याबाबत खुलासा करावा व योजनेचे कोणतेही काम केले जात नसल्यास याबाबत वरिष्ठ पातळीवर योग्य तो निर्णय घेवून शासनाचा खर्च निरर्थक होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**3.457 मौजे आंबोडे तालुका धुळे, जिल्हा धुळे नळ पाणीपुरवठा कामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** मौजे आंबोडे, तालुका धुळे येथील नळ पाणीपुरवठा कामामधील झालेल्या अनियमिततेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापायो-1109/प्र.क्र.1004/(अ) पापु-07, दिनांक 17/03/2010 मधील ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी सुधारीत मार्गदर्शक सुचना देण्यात आल्या असून त्यातील परिच्छेद 3 मधे सुचित केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच या योजनांची अंमलबजावणी करताना संबंधित ग्रामपंचायतीने / ग्रामपाणीपुरवठा व स्वच्छता समितीने जिल्हा परिषद लेखासंहितेमध्ये विहित केल्याप्रमाणे निविदा प्रक्रियेचा अवलंब केलेला नाही.

2) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापायो-1109/प्र.क्र.1004/(अ) पापु-07,दिनांक 17/03/2010 मधील ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी सुधारीत मार्गदर्शक सुचना देण्यात आल्या असून त्यातील परिच्छेद 7.3 (ब) नुसार अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. तसेच शासन निर्णयातील अटीनुसार प्रदान करण्यात आलेले नाही.

3) ग्रामसभेचा ठराव क्रमांक 6,दिनांक 15/12/2010 नुसार ग्रामसभेने मान्य केलेल्या अटी व शर्तीनुसार म्हणजेच निविदेची कागदपत्रे तयार करणे, निविदेची जाहिरात वर्तमानपत्रात देणे, निविदा प्राप्त झालेवर प्रत्यक्ष छाननी करुन अंतिम निर्णय घेणे, निवडलेल्या मक्तेदाराला कार्यादेश देणे, मक्तेदाराच्या कामावर लक्ष ठेवणे, आवश्यकतेनुसार राज्य शासनाने ठरवून दिलेल्या विहित पध्दतीने अथवा दर करारानुसार योजनेसाठी लागणारी सामुग्रीची खरेदी करणे, योजनेच्या बांधकामाच्या टप्प्यानुसार जिल्हा परिषदेने नियुक्ती केलेल्या अभियंत्यांच्या प्रतिस्वाक्षरीनुसार देयक अदा करणे ही कामे करण्यासाठी ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीस पूर्ण अधिकार देण्यात आले असताना समितीने दिलेल्या अधिकारानुसार काम केलेले नाही.

4) मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 मधील कलम 34, 63 व महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग अर्धशासकीय पत्र क्रमांक मुद्रांक 2009/2707/प्र.क्र.36/म-1, दिनांक 09/10/2009 नुसार रुपये 3,800/- ऐवजी रुपये 100/- चा करारनामा केलेला आहे. त्यामुळे रुपये 3,900/- चे शासनाचे नुकसान झालेले आहे.

5) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक 1098/प्र.क्र.28/98 शासन हमी, दिनांक 19/08/1998 अन्वये सदर कामासाठी शासकीय विम्याची रक्कम प्रदान रकमेच्या 1 टक्के प्रमाणे रक्कम रुपये 47,466/- कपात केलेली नाही.

6) महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा, व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीये/2009/ प्र.क्र.108/कामगार 7-अ, दिनांक 17/06/2010 नुसार प्राकलनाचे 1 टक्के उपकराची रक्कम रुपये 47,466/- कपात केलेली नाही, त्यामुळे शासनाचे नुकसान झालेले आहे.

7) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बीडीजी/2005/प्र.क्र.324/इमा.2, दिनांक 03/03/2006 मधील मुद्दा क्रमांक 4 नुसार मुल्यवर्धीत कर नुसार 2 टक्के प्रमाणे रक्कम रुपये 94,932/- वसूल करण्यात आलेले नाहीत.

8) आयकर अधिनियम 1961 कलम 194 सी नुसार 2 टक्के प्रमाणे आयकर रक्कम रुपये 94,932/- कपात करणेत आलेली नाही.

9) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2010/275/प्र.क्र. 172/पंरा-7, दिनांक 19/10/2011 नुसार समितीने e-Tendering खरेदी प्रकीया राबविलेली नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 197 अन्वये पूर्ण कामाच्या नोंदी नमुना नंबर 69 मध्ये घेतलेल्या नाहीत.

11) पंचायतीस (समितीस) अग्रिमाच्या रकमा प्राप्त असून वेळोवेळी सामान्य पावती नमुना नंबर 7 घेण्यात आलेल्या नाहीत.

12) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक 15/12/2006 नुसार कामावर वापरलेल्या (गौण खनिजांची) रॉयल्टीची परिगणना करुन वसूल करणे आवश्यक आहे.

**3.458 पाणीपट्टीची 80 टक्के रक्कम थकबाकीबाबत.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** पाणीपट्टीची 80 टक्के रक्कम थकबाकी बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रमांक ग्रापापु/1002/ प्र.क्र.639/पापु-07, दिनांक 22/05/2003 अन्वये ग्रामपंचायत क्षेत्रात पाणीपट्टीद्वारे वसूल झालेल्या रकमेपैकी 20 टक्के रक्कम संबंधीत ग्रामपंचायत स्वतःकडे ठेवून उर्वरित 80 टक्के रक्कम जिल्हा परिषदेकडे जिल्हा देखभाल दुरुस्ती निधीत जमा करावयाची आहे. असे असतांना दिनांक 31/03/2015 अखेर वसुली नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे जिल्हा परीषदेचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक एलएफसी-2004 /प्र.क्र.4540/विस-3(24),दिनांक 14/07/2004 अन्वये जिल्हा परिषदा व ग्रामपंचायतींनी पाणी पुरवठा योजनेचा संपूर्ण खर्च योग्य पाणीपट्टी दर आकारुन त्याच्या वसूलीतूनच योजनेच्या देखभाल व दुरुस्ती खर्च तसेच पाटबंधारे महामंडळाची पाणीपट्टी आणि योजनेची वीज बीले त्यातूनच भागविली जातील त्या प्रमाणात सुधारीत पाणीपट्टीचे दर निश्चित करुन योजना स्वयंपूर्ण केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रमांक ग्रापापु 1007/ प्र.क्र.217/पापु-07,दिनांक 19/07/2008 अन्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी मीटर पध्दती लागू करण्याबाबत शासनाचे आदेश असतांना आदेशाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

**3.459 अपुर्ण बांधकामांबाबत.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** जिल्हा परिषद, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडे सन 2014-15 अखेर अपुर्ण कामांवर रक्कम रुपये 2,81,35,943/- एवढा खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 17 प्रमाणे नमुना नंबर 23 मध्ये बांधकाम प्रगती नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. सदर कामांवर एकूण रक्कम रुपये 2,81,35,943/- गुंतुन पडलेली आहे. त्यामुळे सन 2013-2014 मधील किती बांधकामे पुर्ण झाली व सन 2014-2015 मध्ये किती नवीन बांधकामे अपूर्ण आहेत याबाबत पडताळणी करता आली नाही. बऱ्याच रकमेची बांधकामे अपूर्ण असून सदरची कामे प्रदिर्घ कालावधी पावेतो अपूर्ण राहिल्यास सदर कामांचा घसारा होऊन कामांवरील खर्च व्यर्थ ठरु शकतो. सदरची कामे अपूर्ण राहिल्यामुळे नागरीक सेवा सुविधांपासुन वंचित राहिले आहेत.

**3.460 मौजे ठाकरवाडी वनकुटे तालुका पारनेर येथील नळपाणीपुरवठा योजना विशेष दूरूस्ती करणे.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास 1098/प्र.क्र.29/98 शासन हमी दिनांक 19/08/1998 व ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक जिल्हा परिषद 2/2000/प्र.क्र.1809/ सीआर/जि.प.संकिर्ण, दिनांक 30/07/2012 नुसार कंत्राटदाराने कामगाराचा विमा उतरवुन सदर विमापत्राची प्रत जिल्हा परिषदेकडे सादर करणे आवश्यक आहे. केवळ विमा संचालनालयाकडे धनाकर्षाने रक्कमा भरणाचे चलन ग्राहय धरण्यांत आले, त्यामुळे शासन आदेशाचे पालन झाले नसल्याने प्रस्तुत नियम बाहयतेस सक्षम प्राधिकाऱ्याचे क्षमापन घेऊन दाखवावे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 अन्वये, ठेवावयाच्या नमुना नंबर 52 मधील नोंदवहीतील कामाची 5 टक्के मोजमापे तपासल्याचा दिनांक नमूद करण्यांत आलेला नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 नियम 197 नुसार कामाच्या नोंदी नमूना 69 मध्ये घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रा.पा.पु./1093/सीआर/448अ/39अ, दिनांक 17/09/1994 परिच्छेद क्रमांक 10 नुसार पुर्ण झालेल्या नळ पाणीपुरवठा योजनेसाठी पुर्व इतिहास पत्र 1.9 मध्ये विद्युत हिस्ट्रीशीट ठेवणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केल्याची खात्री पटवावी.

4) मोजमाप नोंदवहीवर लाल शाईने कर्ण रेषा काढुन रद्द करण्यांत आलेले नाहीत.

5) सदर कामासाठी मोजमाप पुस्तिकेप्रमाणे 10 एच पी 19 स्टेजचास सबमर्शिबल पंप वापरला असून, त्या पंपाची मोजमाप पुस्तिकेनुसार रुपये 48,826/- किंमत आहे. परंतू सदरचा पंप हा कोणत्या कंपनीचा बसविला ते मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेले नाही. त्यामुळे बसविलेला सबमर्शिबल पंप हा बाजार भावाप्रमाणे व जिल्हा दरसुचीप्रमाणे रक्कम रुपये 48,826/- या किमतीचा बरोबर असल्यबाबत खात्री करता आलेली नाही. बसविलेला पंप कोणत्या कंपनीचा आहे. त्या पंपाची जिल्हा दरसुची प्रमाणे व बाजारभावप्रमाणे असलेली किंमत यामध्ये तफावत आढळुन आल्यास तफावतीची रक्कम निश्चित करुन ती जबाबदारी निश्चितीने संबंधीताकडून वसुलीस पात्र राहील.

**3.461 मौजे धोत्रे ता. कोपरगांव येथे पाणीपूरवठा योजनेची सार्वजनिक विहीर खोदाई व बांधकाम करणे गट नंबर 1 मधील ग्रामपंचायत मिळकत क्रमांक 983.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 26) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग,शासन निर्णय क्रमांक विमास 1098/प्र.क्र.29/98 शासन हमी, दिनांक 19/08/1998 व ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक जिल्हा परिषद 2/2000/ प्र.क्र.1809/सीआर/जि.प.संकिर्ण,दिनांक 30/07/2012 नुसार कंत्राटदाराने कामगाराचा विमा उतरवुन सदर विमापत्राची प्रत जिल्हा परिषदेकडे सादर करणे आवश्यक आहे. केवळ विमा संचालनालयाकडे धनाकर्षाने रक्कमा भरणाचे चलन ग्राहय धरण्यांत आले. त्यामुळे शासन आदेशाचे पालन झाले नसल्याने प्रस्तुत नियम बाहयतेस सक्षम प्राधिकाऱ्याचे क्षमापन घेऊन दाखवावे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 अन्व्ये ठेवावयाच्या नमूना नंबर 52 मधील नोंदवहीतील कामाची 5 टक्के मोजमापे तपासल्याचा दिनांक नमूद करण्यांत आलेला नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 नियम 197 नुसार कामाच्या नोंदी नमूना 69 मध्ये घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग,शासन निर्णय क्रमांक ग्रा.पा.पु./1093/सीआर/448अ/39अ,दिनांक 17/09/1994 परिच्छेद क्रमांक 10 नुसार पुर्ण झालेल्या नळ पाणीपुरवठा योजनेसाठी पुर्व इतिहास पत्र 1.9 मध्ये विद्युत हिस्ट्रीशीट ठेवणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केल्याची खात्री पटवावी.

4) मोजमाप नोंदवहीवर लाल शाईने कर्णरेषा आढुन रदद करण्यांत आलेले नाहीत.

5) सदर कामाची मोजमाप पुस्तिका तपासता या कामावरील एकूण रुपये 2,963/- रॉयल्टी कपात करणे आवश्यक असताना रॉयल्टीची रक्कम कपात न करता सर्व रक्कम ठेकेदार ग्रामपंचायतला प्रदान केली आहे.

6) सदर कामाचा व कामगारांचा विमा उतरविल्या बाबत रक्कम रुपये 2,991/- चा डिमांडड्राफ पाठविलेला असून विमापॉलिसीचे विमापत्रे / कागदपत्रे नस्ती मध्ये आढळून आली नाहीत.

### 3.462 मंजुर आकृती बंधापेक्षा जादा पदाचे वेतन अदा केलेबाबत.

**जिल्हा परिषद पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** जिल्हा परिषद पुणे ग्रामीण पाणी पुरवठा यांनी मंजूर आकृती बंधानुसार मंजूर पदापेक्षा जादा पदाचे वेतन अदा केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे परिशिष्ठ 4 मधील विभाग ब (उपविभाग 3) मधील नियम 23 व 23(2) अन्वये स्थायी अस्थायी आस्थापनेची लेखा परीक्षा नोंदवही नमुना नंबर ए पी पी 2 मध्ये ठेवण्यात आलेली नाही. सदर नोंदवहीत आस्थापनेची मंजूर पदे पदाची वेतन श्रेणी व संलग्न भत्त्याबाबत मूळ वेतन रजा वेतन व स्थानापन्न वेतन या बाबींची देयके प्रदान होण्यापूर्वी व त्यांचे लेखापरीक्षण होऊन त्याची एस एल ओ रजिस्टर मध्ये नोंदी घेण्याची कार्यपद्धती अवलंबिण्याचे आदेश असताना अशी नोंदवही न ठेवता लेखा विभागाने वेतन व भत्त्याची देयके अदा केली आहेत.

2) मंजूर आकृती बंधानुसार कनिष्ठ अभियंता यांचे 1 पद मंजूर असून कार्यरत 2 पदे आहेत. त्यामुळे एका पदाचे अतिरिक्त वेतन 5,37,601/- अदा करण्यात आले. तसेच वायू संपीडक चालक यांचे 2 पदे मंजूर असून 3 पदांचे वेतन काढण्यात आल्याने एका पदाचे वेतन रक्कम रुपये 3,01,601/- जादा अदा करण्यात आले. तरी असे दोन अतिरिक्त पदांचे वेतन (विना मान्यता) काढण्यात आल्याने रक्कम रुपये 8,39,202/- नियमबाह्यरित्या अदा झालेली आहे.

### 3.463 मगरवाडी तालुका बारामती, नळ पाणी पुरवठा दुरुस्ती कामातील अनियमिततेबाबत.

**जिल्हा परिषद पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 32) -** ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे जिल्हा परिषद पुणे यांनी सन 2014-15 या वर्षात मगरवाडी तालुका बारामती येथे नळ पाणी पुरवठा दुरुस्ती कामासाठी शासननिधी मधून 8,72,600/- इतकी रक्कम खर्च केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कामाच्या सर्व साधारण वर्णनात व निरीक्षण अहवालात नमूद केले प्रमाणे नळ पाणी पुरवठा योजनेची दाब नलिका जागोजागी तुटून हानी झालेली आहे. व पाईप वर आल्याने दाब नलिकेची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. काम करताना जुनी पाईप लाईन काढून त्याठिकाणी नवीन पाईप लाईन करणे आवशयक होते. परंतु नवीन ठिकाणी खोदाई करून खोदाई कामी जादा खर्च करण्यात आला. याबाबत महाराष्ट्र शासन ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रमांक टंचाई 1099/प्र.क्र/पापु14,दिनांक 03/02/1999 नुसार जिल्हाधिकारी पुणे यांचे प्रशासकीय मान्यता आदेश दिनांक 11/06/2014 मधील नमूद केलेल्या अटी नुसार टंचाईच्या कामात काटकसर करणे व शक्य तितका खर्च कमी करणे आवश्यक आहे. परंतु सदर कामात रक्कम रुपये 2,21,207/- जादा खर्च झाला आहे. डीसमेंटलिंग ऐवजी नवीन पाईपलाईन खोदाई केल्याने मुंबई वित्तीय नियम 1959 मधील नियम क्रमांक 58 नुसार वित्तीय औचित्य सूत्रांचा भंग झाला आहे.

2) निविदेतील शर्त क्रमांक 14 व 15 तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम क्रमांक 120, 152 (2), 153 नुसार अंदाजपत्रकातील एखाद्या बाबीवर तरतुदीपेक्षा 25 टक्के पेक्षा वाढ होत असेल किंवा खर्च रुपये 5,000/- पेक्षा जादा होत असेल तर तांत्रिक मान्यता देण्यास सक्षम प्राधिकारी असलेल्या अधिकाऱ्याची पूर्व मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतु सदर कामात बाब क्रमांक 1 या वाढीव बाबीकरिता पूर्व मान्यता घेण्यात आलेली नसल्याने अनियमितता झालेली आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम क्रमांक 180 व महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली परिशिष्ठ 24 (नियम 13 ते 15) नुसार लेखा शाखेने रक्कम प्रदान केले नंतर मोजमाप पुस्तकात दुसरी कर्णरेषा मारलेली नाही.

**3.464 मौजे केडगाव नळ पाणीपुरवठा दुरुस्ती करणे या कामातील दुरुस्ती करणेबाबत. (तालुका दौंड.)**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 47) -** ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे जिल्हा परिषद पुणे यांनी सन 2014-15 या वर्षात एकात्मिक पाणी व्यवस्थापन कार्यक्रम अंतर्गत मौजे केडगाव तालुका दौंड येथे नळ पाणी पुरवठा दुरुस्ती कामासाठी जिल्हा परिषद निधी मधून 8,70,046/- इतकी रक्कम खर्च केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरचे काम ठेकेदाराने 30/07/2014 पासून सुरु केले असून डीवॉटरिंगचे कामा करीता रक्कम रुपये 54,000/- अदा करण्यात आले. (900 HP/HIx60) परंतु नस्ती सोबत डीवॉटरिंग तक्ता अंतिम देयकासोबत जोडण्यात आलेला नसल्याने रक्कम रुपये 54,000/- वसूलपात्र करून जिल्हा परिषद निधीत जमा करण्यात यावी. सदर बाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समित्या लेखा संहिता 1968 चे नियम क्रमांक 150 नुसार तांत्रिक शाखेकडून अंदाजपत्रकाची तपासणी करणेची कार्यवाही केलेली नाही.

2) शासन महसूल व वन विभाग निर्णय क्रमांक गौणखनि10/1009/प्र.क्र.309/ब,दिनांक 11/02/2010, मुंबई गौणखनिज उत्खनन नियम 1955 अनुसूची 1 व 2 नुसार दुरुस्ती करणेच्या कामाकरिता गौण खनिजाच्या वापरापैकी बाब क्रमांक 1 व 2 करिता स्वामित्व धनाची रक्कम रुपये 7,278/- वसूल करण्यात आलेली नसल्याने ती वसूल पात्र ठरते.

3) शेड बांधकाम ज्या जागेवर करण्यात आले ती जागा ग्रामपंचायतीची असले बाबत 8 अ चा उतारा जोडलेला नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समित्या लेखा संहिता 1968 मधील नियम क्रमांक 180 व महाराष्ट्र बांधकाम विभाग नियमावली परिशिष्ठ 24 नियम 13 ते 15 लेखा शाखेने मोजमाप पुस्तिकेत दुसरी कर्ण रेषा मारलेली नाही.

**3.465 खानापूर ठाकरवाडी नळ पाणी पुरवठा तालुका जुन्नर दुरुस्ती करणे याकामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 48) -** ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे जिल्हा परिषद पुणे यांनी सन 2014-15 या वर्षात एकात्मिक पाणी व्यवस्थापन कार्यक्रमा अंतर्गत खानापूर ठाकरवाडी तालुका जुन्नर येथे नळ पाणी पुरवठा दुरुस्ती कामासाठी जिल्हा परिषद निधी मधून 11,54,684/- इतकी रक्कम खर्च केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) एखाद्या बाबीवर अंदाज पत्रकातील तरतुदी पेक्षा 25 टक्के वाढ होत असेल किंवा खर्च 5,000/- पेक्षा जादा खर्च होत असेल तर महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 114 व 118 अन्वये व निविदेमधील निविदा शर्त क्रमांक 38 नुसार कामास तांत्रिक मंजुरी देणाऱ्या सक्षम अधिकाऱ्याची निरीक्षण टिपणी द्वारे पूर्व मान्यता घेऊन पुढील काम करणेचे आहे. परंतु बाब क्रमांक 2 व 3 करिता पूर्व मान्यता न घेताच वाढीव काम करण्यात आले. महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 120, 152(2) नुसार तसेच 153 कडे दुर्लक्ष करून अनियमितता झालेली आहे. सदर बाबीकरिता झालेला वाढीव खर्च रक्कम रुपये 1,73,699/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

2) बाब क्रमांक 1,2, 8 व 11 चे काम 100 टक्के करण्यात आलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 114 प्रमाणे कामाच्या नकाशात बदल झाल्याने सुधारित अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक होते. नियम 120 प्रमाणे बचतीतून पूर्व परवानगी शिवाय जादा काम पार पाडण्यासाठी वापरण्यात येऊ नये. तसेच 153 (3) नुसार अंदाजपत्रकात नमूद केलेल्या बाबींचे बांधकाम काटेकोरपणे काम करणे अभिप्रेत आहे. बचत ही वाढीव बाबीवर वापरल्याने नियमांचा भंग झालेला आहे.

3) बाब क्रमांक 3 excavation for foundation pipe trenches in soft / hard rock खोदाई साठी सन 2013-14 जिल्हा दर सूचीतील दर (महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पान क्रमांक 36 बाब क्रमांक सी) 701 नमूद केलेले आहेत. दरपृथःकरण करते वेळी 776.15 क्यूबिक मीटर करिता रक्कम रुपये 720.50/- जादा अदा करण्यात आल्याने (720.50 - 701= 19.50*276.15=5385) रक्कम रुपये 5,385/- वसूलपात्र ठरतात. महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समित्या लेखा संहिता 1968 चे नियम क्रमांक 150 नुसार तांत्रिक शाखेकडून अंदाजपत्रकाची तपासणी करणेची कार्यवाही केलेली नाही.

4) नस्ती सोबत ज्या जागेवर काम करण्यात आले ती जागा ग्रामपंचायतीची असले बाबत 8 अ चा उतारा जोडलेला नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समित्या लेखा संहिता 1968 मधील नियम क्रमांक 180 व महाराष्ट्र बांधकाम विभाग नियमावली परिशिष्ठ 24 नियम 13 ते 15 लेखा शाखेने मोजमाप पुस्तिकेत दुसरी कर्ण रेषा मारलेली नसल्यामुळे दुबार देयक अदा होण्याची शक्यता आहे.

**3.466 निर्लेखीत वाहने व त्यांच्या लिलावाबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद सातारा यांचेकडील निर्लेखीत वाहने व त्यांच्या लिलावाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) यांत्रिकी विभागाने सादर केलेल्या यादीनुसार 17 वाहने रुपये 15,46,500/- रकमेस लिलावामध्ये विकलेली असून त्यांची रक्कम जिल्हा परिषद सेस संकिर्ण खाती जमा करण्यात आलेली आहे. तथापि जिल्हा परिषद सेसमधून खरेदी केलेल्या वाहनांव्यतिरिक्त अशा वाहनांची यादीकाढून शासन अनुदानातून घेतलेल्या शासकीय वाहनांची सर्व लिलावाची रक्कम शासन सदरी जमा करणे आवश्यक आहे.

2) यांत्रिकी विभागाने सादर केलेल्या यादीनुसार एकूण 16 वाहनांची बोली अमान्य झाली. 7 वाहनांना बोलीच आली नाही व 17 वाहने लिलावात विक्री झाली, तथापि विभागाकडे एकूण वाहने किती जमा झाली. त्यापैकी यापूर्वी किती वाहनांची विक्री झाली, किती वाहने शिल्लक आहेत, वाहने कोणत्या दिनांकास जमा करण्यात आली याबाबत नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे लिलावाशिवाय परस्पर विल्हेवाट किंवा लिलावामध्ये सर्व वाहने न घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत सक्षम अधिकाऱ्यामार्फत पडताळणी आवश्यक आहे.

3) वाहने लिलावामध्ये विकल्यावर तात्काळ खरेदीदाराच्या नावावर केल्याबाबत कागदपत्रे दप्तरी नाहीत. त्यामुळे अद्यापपर्यंत वाहने जिल्हा परिषदेच्या मालकीची असून भविष्यात वाहनांचे अपघात, तसेच बेकायदेशीर वापराबाबत जबाबदारी जिल्हा परिषदेवर येणार आहे. याबाबत सन 2009-10 मध्ये लिलावाद्वारे विक्री झालेले वाहन क्रमांक एम.एच.11-4023 लिलावाद्वारे विक्री होऊनही केवळ वाहन संबंधितांच्या नावे वर्ग न केल्याने जिल्हा परिषदेस न्यायालयीन निर्णयाद्वारे नुकसान भरपाई द्यावी लागली होती. याबाबत संबंधित विभागाने कोणताही धडा न घेता कार्यपध्दतीत सुधारणा केलेचे लेखापरीक्षणास दिसून येत नाही. याबाबत तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**3.467 विशेष दुरुस्ती नळ पाणी पुरवठा योजना, निवळी.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद सातारा यांचेकडील विशेष दुरुस्ती नळ पाणी पुरवठा योजना, निवळीबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बाब क्रमांक 2 अन्वये नविन पुरवठा केलेले पाईप 40 mm डाय जी.आय. पाईप परिमाण 600 रनिंग मीटर असून बाब क्रमांक 1 अन्वये परिमाण 972 रनिंग मीटर जुने खुदाईतून काढलेले पाईप आहेत जुने पाईपांपैकी 600 रनिंग मीटर ग्रामपंचायतीच्या ताब्यात दिले आहेत. उर्वरीत 372 कामात वापरुन 972 रनिंग मीटर परिमाणाने काम करणे आवश्यक असता, 1058 रनिंग मीटर परिमाणाने काम केल्याने जादा परिमाण 78 रनिंग मीटरचे रुपये 55 दराने रुपये 4,290/- शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

2) बाब क्रमांक 1 अन्वये निघालेली जुनी पाईप पैकी 40 mm 600 रनिंग मीटर व 25 mm 528 रनिंग मीटर पाईप ग्रामपंचायतीच्या ताब्यात दिल्याबाबत पत्रांवर दिनांक नमूद नसल्याने प्रत्यक्षात कधी ताब्यात दिल्या याचा बोध होत नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 163 नमुना 52 मध्ये कामाची मोजमाप पुस्तिका न ठेवता ग्रामपंचायत नमुना नंबर 23 मध्ये ठेवण्यात आल्याने नियमबाहयता झाली आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 180 नुसार कामाच्या गोषवाऱ्याखाली मोजमाप पुस्तिकेत प्रदान बिलाचा प्रमाणक क्रमांक व दिनांक नमूद करणे आवश्यक असता यामध्ये नियमबाहयता झाली आहे.

5) सदर कामाचे मंजूर अंदाजपत्रक नस्तीसोबत जोडलेले नाही. त्यामुळे अंदाजपत्रकातील बाबींनुसार काम झालेचे पडताळता आले नाही.

**3.468 पाणी पुरवठा योजना खर्चातील अनियमीततेबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद सांगलीचे सन 2014-2015 च्या लेखापरिक्षणात जिल्हा वार्षिक योजना व इतर राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत रक्कम रूपये 18,06,13,741/- इतका खर्च नोंदवला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामीण पाणी पुरवठा स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापयो/1109/प्र.क्र.104/पापु/07,दिनांक-17/03/2010नुसार दिनांक 30/08/2010 पर्यंत 5 कोटी पर्यंतच्या कामांना प्रशासकीय मान्यता जिल्हा परिषद जल व्यवस्थापन समितीने देणे आवश्यक असताना ग्रामपंचायतीने दिली आहे ही बाब नियमबाह्य आहे.

2) प्रमाणकासोबत जोडलेल्या अनुदान वर्ग करणेस मंजुरी दिलेल्या आदेशामध्ये सदर आदेशापुर्वी किती अनुदान वर्ग केले व आदेश अखेर एकूण किती अनुदान वर्ग केले याचा तपशील आदेशामध्ये नोंदवणे आवश्यक असताना नोंदवलेला नाही व उपलब्धही केलेला नाही. त्यामुळे आदेशापूर्वी किती अनुदान वर्ग केले व आदेशा अखेर योजनेसाठी एकूण किती अनुदान वर्ग केले याबाबत खात्री होत नाही.

3) पूर्ण झालेल्या कामाचे मुल्यांकन दाखले व पूर्णत्वाचे दाखले प्रमाणकांसोबत जोडणे आवश्यक असताना जोडले नाहीत.

4) मोजमाप पुस्तकाच्या नोंदी महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 165 नुसार नमुना नंबर 53 मध्ये नोंद घेणे आवश्यक असताना नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

5) महाराष्ट्र शासन ग्रामीण पाणी पुरवठा स्वच्छता विभाग शासन निर्णय ग्रापयो/1109/प्र.क्र.104/(पापु)/07, दिनांक 17/03/2010 नुसार रुपये 50 लक्ष ते रुपये 5 कोटी पर्यंत योजनांची तांत्रिक अंमलबजावणी जिल्हा परिषदेने करणेची असताना व सर्व कागदपत्रे मोजमाप नोंदवहीसह जिल्हा परिषद स्तरावर असणे आवश्यक आहे. तथापि तशी कार्यवाही केलेली नाही. मोजमाप पुस्तके उपलब्ध झाली नाहीत.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामीण पाणी पुरवठा स्वच्छता विभाग, शासन निर्णय ग्रापयो/1109/प्र.क्र.104/(पापु)/07,दिनांक 17/03/2010 नुसार ग्राम पंचायत स्तरावर तांत्रिक व्यक्तीची अथवा संस्थेची नेमणूक करणे आवश्यक असताना तांत्रिक कामासाठी कोणाची नेमणूक केली आहे त्याची यादी उपलब्ध केलेली नाही.

7) ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने दिलेल्या माहितीनुसार गावातील नळपाणी पुरवठा योजना अपूर्ण अवस्थेत आहेत. अपूर्ण कामावर सन 2014-2015 अखेर एकूण किती रक्कम खर्च झाली आहे याची कोणतीही माहिती कागदपत्रासह उपलब्ध केली नाही.

8) सन 2014-2015 च्या आराखड्यास शासनाची मंजुरी घेणे आवश्यक असताना तशी मंजुरी मिळाली असलेबाबतचे आदेश उपलब्ध केलेले नाहीत.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामीण पाणी पुरवठा स्वच्छता विभाग, शासन निर्णय ग्रापयो/1109/ प्र.क्र.104/(पापु/07,दिनांक 17/03/2010 परिछेद क्रमांक 4 नुसार रुपये 2.50 कोटी पर्यंतच्या कामाची कामाची गुणवत्ता तपासणी व सबंधित कार्यवाही अधिक्षक अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व त्यापुढील रुपये 2.50 कोटी ते रुपये 5 कोटी पर्यंतच्या कामाची गुणवत्ता तपासणी व सबंधित कार्यवाही मुख्य अभियंता यांनी करणेची आहे, तथापि तशा कार्यवाहीचे प्रमाणपत्र उपलब्ध झाले नाही.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामीण पाणी पुरवठा स्वच्छता विभाग, शासन निर्णय ग्रापयो/1109/ प्र.क्र.104/(पापु)/07, दिनांक 17/03/2010 नुसार परिच्छेद क्रमांक 8 (1) नुसार प्रत्येक स्टेज साठी कार्यारंभ आदेश स्वतंत्रपणे देणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

11) शासन निर्णय, ग्रामीण पाणी पुरवठा-1098/प्रक्र-245,पापु-47, दिनांक 11/01/1999 नुसार योजनांची इतिहास नोंदवही नमुना नंबर 17 मध्ये ठेवणे आवश्यक आहे. तथापि तशी कार्यवाही केलेली नाही.

12) महाराष्ट्र शासन, ग्रामीण पाणी पुरवठा स्वच्छता विभाग, शासन निर्णय ग्रापयो/1109/ प्र.क्र.104/(पापु)/07, दिनांक 17/03/2010 मधील अनुक्रमांक 11 नुसार योजना पूर्ण झाल्यावर ठेकेदाराने एक वर्ष योजना चालविणे आवश्यक आहे व योजना एक वर्ष चालाविल्याबाबत प्रमाणपत्र सादर केल्यानंतर ठेकेदारास 10 टक्के रक्कम देय आहे. परंतु तसे प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे व योजना पूर्ण होवून एक वर्ष चालविल्यानंतर प्राप्त अनुदानापैकी किती व कोणत्या कामांची 10 टक्के रक्कम दिली आहे किंवा अद्याप देणे बाकी आहे याबाबतची कोणतीही माहिती लेखा परीक्षणास उपलब्ध केली नाही. त्यामुळे त्याची खात्री करता येत नाही.

13) महाराष्ट्र शासन, ग्रामीण पाणी पुरवठा स्वच्छता विभाग, शासन निर्णय ग्रापयो/1109/ प्र.क्र.104/(पापु/07, दिनांक 17/03/2010 नुसार योजना पूर्ण झाल्यावर हस्तांतर करणे आवश्यक आहे. त्यासाठी योजना पूर्ण झालेल्या योजनांची नोंद महाराष्ट्र जिल्हा परिष्द व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 197 नुसार रजिस्टरला घेणे आवश्यक असून वार्षिक परिरक्षण अंदाज व कामाच्या तपशिलवार नोंदीसह परिपूर्ण ठेवलेबाबत नोंदवही उपलब्ध केलेले नाही. त्यामुळे त्याबाबत खात्री करता आली नाही.

14) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 104 नुसार अपूर्ण कामाच्या यादीस जिल्हा परिषदेची मान्यता घेणे आवश्यक असताना घेतलेली नाही. विवरण पत्र क्रमांक 2 मध्ये दिलेल्या माहितीनुसार 63 कामे अपूर्ण दिसून येतात त्यामध्ये रक्कम रुपये 11,744.553 लक्ष एवढा खर्च नोंदवलेला आहे आणि अंदाज पत्रक रक्कम रुपये 19,513.48/- लक्ष त्यामुळे तेवढी रक्कम गुंतून राहिली आहे

15) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद सांगली यांचे आदेशानुसार भारत निर्माण योजनेच्या अदा केलेल्या रक्कमेतून 20 टक्के अबकारी कर त्यावर 16 टक्के सरचार्ज वसुल करून भरणा करणेबाबत आदेश दिलेले आहेत. तथापि तशी वसुली केलेली नाही.

16) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक जिवायो 1007/ प्र.क्र.39/का-1444,दिनांक 16/02/2008 नुसार केंद्रपुरस्कत योजना राबविताना केंद्र 75 टक्के व राज्य 25 टक्के दोन्हीचा निधी वापरणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

17) सन 2014 अखेर 920 कामे अपूर्ण होती परिशिष्ट क्रमांक 10 मध्ये नमूद Action plan नुसार 162 कामे पूर्ण नमूद आहेत व 165 रद्द आहेत त्यामुळे 920-327 = 593 कामे अपूर्ण असणे आवश्यक असताना 493 अपूर्ण असल्याचे दिसतात. यावरून अपूर्ण कामाच्या माहितीमध्ये तफावत दिसून येत आहे.

18) माहे डिसेंबर 2014 व मार्च 2015 मध्ये प्रमाणकाद्वारे अदा केलेल्या रक्कमा ग्रामपंचायतींना प्राप्त झाल्याबाबत ग्रामपंचायतींकडून विहीत नमुन्यातील पावत्या प्राप्त करून घेतलेल्या नाहीत.

19) महाराष्ट्र शासन, ग्रामीण पाणी पुरवठा स्वच्छता विभाग, शासन निर्णय ग्रापयो/1109/ प्र.क्र.104/(पापु)/07,दिनांक 17/03/2010 मधील अनुक्रमांक क्रमांक 2.1 अन्वये आधी तांत्रिक मान्यता व नंतर प्रशासकीय मान्यता द्यावी असे असताना 28 कामांच्या योजनांना तांत्रिक मान्यता पूर्वी प्रशासकीय मान्यता दिली आहे. त्यामुळे शासन निर्णयाचे उल्लंघन झाल्याचे दिसून येते.

**3.469 हातपंप वीजपंप वर्गणी थकबाकीबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे सन 2014-2015 चे लेखापरीक्षण करताना हातपंप वीजपंप वर्गणी थकबाकीबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2013-2014 च्या लेखापरीक्षण अहवालानुसार अखेर शिल्लक रुपये 90.22 लक्ष असताना सन 2014-2015 मध्ये सुरुवातीची शिल्लक रुपये 68.30 लक्ष दर्शविली आहे. तरी ती रुपये 21.92 लक्ष ने कमी दर्शविली आहे खुलासा होणे आवश्यक आहे.

2) सुरुवातीची शिल्लक कमी नमूद केल्याने मागणी ही तेवढ्याने कमी नमूद आहे.

3) वसुली, 46.12 टक्केने म्हणजेच 50 टक्के पेक्षा कमी आहे परंतु कमी मागणी रुपये 21.92 लक्ष मागणीमध्ये घेतल्यास वसुलीची टक्केवारी 45 टक्के आहे.

4) सन 2013-2014 च्या अहवालमध्ये परिच्छेद क्रमांक 35 नुसार रुपये 10.04 लक्ष ने सन 2013-2014 सुरवातीची शिल्लक कमी नमूद असलेबाबत परिच्छेद नोंदविला आहे यावरून अखेर शिल्लक व सुरुवातीची शिल्लक कायम तफावत दिसत आहे.

तरी याबाबत ताळमेळ घेण्यात यावा तसेच हातपंप वीजपंप वर्गणी थकबाकीबाबत परिशिष्ट क्रमांक 9 जोडले आहे. त्यानुसार थकबाकी रक्कम रुपये 145.89 लक्ष एवढी असून थकबाकी मोठ्या प्रमाणात आहे तरी सदर थकबाकी वसूल करणेबाबत उपाययोजना करून 100 टक्के वसुली करून पूर्तता दाखवावी.

**3.470 हातपंप सुटे भाग खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 18) -** ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद सांगलीचे सन 2014-2015 च्या लेखापरीक्षणात देखभाल दुरूस्ती योजनेतून वित्तप्रमाणकाद्वारे कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा जि.प सांगली यांनी आदेश क्रमांक का.अ/ ग्रापापु/जिपसां/117/2013, दिनांक 25/03/2013 अन्वये संपूर्ण जिल्हातील विंधन विहीरीवरील हातपंप व विजपंप दुरूस्तीसाठी रक्कम रुपये 87,52,000/- पंचायत समिती जत, आटपाडी, शिराळा कडे वर्ग केलेले आहेत. उपरोक्त रक्कम वर्ग व खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) देखभाल दुरूस्ती निधी, हा मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे अधिन असतांना सर्व पंचायत समिती कडील हातपंप व विजपंप दुरूस्तीसाठीची रककम रूपये 87,52,000/- वर्ग केली ही बाब नियमबाहय आहे.

2) सांगली जिल्हातील मिरज, तासगांव, खानापूर, कडेगांव व पलुस पंचायत समित्या हातपंप व विजपंप वर्गणी वसुल करून देखभाल दुरूस्तीमध्ये भरणा करीत नसल्याचे दिसुन आले.

3) जिल्हातील सर्व पंचायत समितीकडून सन 2014-2015 करिता आवश्यक असणा-या हातपंपाच्या सुटया भागांची एकूण मागणी घेणेत आलेली नाही.

4) वार्षिक ख्ररेदी रक्कम रुपये 42,64,649/- व रक्कम रुपये 87,52,000/- अशी एकूण रक्कम रुपये 1,30,16,649/- ची असतांना शासन निर्णय ग्रामविकस विभाग क्रमांक दिनांक 13/01/2013 नुसार सदर खर्चास जिल्हा परिषद, सांगली यांची प्रशासकीय व शासनाची तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक असतांना कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद सांगली यांनी तुकडे पाडून प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देवून खरेदी केलेली आहे.

5) महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस 1088/(2512)/उद्योग-6, दिनांक 02/01/1992 नुसार निविदा मागवून खरेदी करणे आवश्यक होते परंतु तशी कार्यवाही केलेली नाही. शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक संकीर्ण-2010/ 275/प्र.क्र/172/पंरा-7, दिनांक 19/10/2011 व शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-2013/प्रक्र/49/पंरा-7, दिनांक 07/02/2013 नुसार दिनांक 01/02/2013 पासुन 1 लाखापेक्षा जास्त किंमतीच्या साहित्य खरेदीसाठी ई - निविदा कार्यप्रणालीच्या अवलंब करणे जिल्हा परीषदेस बंधनकारक असतांना त्याप्रमाणे ई - निविदाद्वारे निविदा मागवून खरेदी न करता जिल्हा परिषद कडील दरकरार क्रमांक 37, दिनांक 09/01/2012 नुसार खरेदी केली आहे ही बाब उक्त शासन निर्णयाविरूध्द आहे.

**3.471 हातपंप दुरुस्ती व देखभाल योजनेकरीता हातपंप सुटे भाग 12 एम एम कनेक्टींग रॉड खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 19) -** ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडील हातपंप सुटे भाग 12 एमएम कनेक्टींग रॉड इत्यादी खरेदी करिता शासन निधी मधून रक्कम रुपये 6,80,065/- इतका खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) हातपंप सुटे भाग/कनेक्टींग रॉड करिता गटाकडील मागणी पत्रे माहे जून 2014 मधील असताना दिनांक 19/01/2015 रोजी निविदा प्रसिध्दी करुन दिनांक 26/03/2015 रोजी साहित्य खरेदी केल्याने इतक्या मोठ्या विलंबाबत साधार स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे.

2) पुरवठादाराकडील साहित्य पोहोच झालेबाबत डिलिव्हरी चलन उपलब्ध न झालेने प्रत्यक्षात साहित्य कधी प्राप्त झाले याचा बोध होत नाही.

3) सन 2014-2015 मध्ये खरेदी साहित्याचा विनियोग निरंक आहे. मागणी नसताना गटांना वाटप केलेचे दिसते. देयकानुसार 2000 नग खरेदी केले आहेत तर 1474 नगांचे वाटप केले आहे. अद्याप 716 नग शिल्लक आहेत. एकूण पहाता आवश्यकता नसताना साहित्य खरेदी केलेचे दिसते त्यामुळे निधी नाहक गुंतुन राहिला आहे

4) महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भाखंस/1088/2512/उद्योग 6, दिनांक 02/01/1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.4 अन्वये चिन्हांकित नसलेल्या वस्तू खरेदी/सुटे भाग खरेदीसाठी विस्तृत व बाबनिहाय नसल्याने तसेच मेकॅनिकल दरसूची मध्ये बाबनिहाय गुणवत्ता, दर्जा व दरनिहाय सुटे भाग खरेदीसाठी मान्यता प्राप्त उत्पादक कंपनीचे दर व बाबी नमूद न केल्याने संपूर्ण खरेदी नियमबाहय ठरते.

**3.472 राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मौजे कणवस तालुका दक्षिण सोलापूर येथील नळपाणी पुरवठा योजना.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग, परिपत्रक क्रमांक BCA/12007/प्रक्र 788/ कामगार-7,दिनांक 21/04/2008 अन्वये 1 जानेवारी 2008 पासून एकूण मूल्याच्या 1 टक्के उपकर वसूल करून बांधकाम कामगार कल्याण यांच्या कडे भरणा करणे आवश्यक आहे. त्यानुसार उपरोक्त नुमुद कामावरील झालेला एकूण खर्च रक्कम रुपये 44,26,136/- एवढ्या रक्कमेवर 1 टक्के रक्कम रुपये 44,261/- वसूल करून कामगार कल्याण मुंबई यांच्या कडे भरणा करणे आवश्यक आहे.

1) सदर निधी अतिवृष्टि झाल्यामुळे झालेल्या नुकसान भरपाई करण्याकरीता प्राप्त झालेली असुन प्रशासकिय मंजुरी आदेशातील अट क्रमांक 16 नुसार काम दिनांक 31/03/2014 पर्यंत पुर्ण करणे आवश्यक असतांना विभागाने सदर काम हे सन 2014-2015 मध्ये पुर्ण करण्याकरीता माननिय जिल्हाधिकारी यांची प्रशासकिय मान्यता घेतलेली नाही. त्यामुळे प्रशाकिय मंजुरीशिवाय केलेला खर्च मान्य करता येत नाही.

2) कामाचा आदेश व काम पुर्णत्वाच्या दिनांकावरुन सदर काम हे एका दिवसात पुर्ण झाल्याचे दिसुन येत आहे. परंतु मोजमाप पुस्तिका 510 पान क्रमांक 931 वर बाब क्रमांक 2 Dewatering The Excavated Trenches And Pools Of Water हे काम दोन 7.5 एच.पी.मोटार पंपाच्या सहाय्याने 15 दिवस कार्यान्वित केल्याचे नमुद आहे. कामावरील खर्च रक्कम रुपये 55,755/- लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

3) प्रशासकीय मंजुरी अट क्रमांक 8 नुसार सदर कामाचे उपयोगिता प्रमाणपत्र व कामपुर्णत्वाचे प्रमाणपत्र जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविण्यात आल्याबाबत पोच नस्तीत आढळुन आलेली नाही.

### 3.501 मौजा मोरवा, पाणी पुरवठा योजना विशेष दुरुस्ती, उपविभाग चंद्रपूर.

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** उपरोक्त प्रमाणकाद्वारे मौजा मोरवा, पाणी पुरवठा योजना विशेष दुरुस्ती या कामावर रुपये 1,99,240/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2014-15 मध्ये जिल्हा परीषदेने ई-निविदा पध्दतीचा अवलंब करुन अंतिम वाटाघाटी करुन विंधन विहीराच्या कामाकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, चंद्रपूर यांचे दर मंजुरी आदेश/480/2014, दिनांक 13/02/2014 नुसार मंजुर केले आहेत. तसेच सदर दर हे दिनांक 13/05/2014 लागू असेल असे आदेशात नमुद आहे. परंतु वरील नमुद कामात जिल्हा परीषद मंजुर दर व मोजमाप पुस्तिकेत नमुद दर यात मोठी तफावत दिसुन येत आहे. तरी जादा प्रदानाची रक्कम रुपये 18,526/- संबंधिताकडुन वसुल करण्यात यावे.

2) मोजमाप पुस्तिकेत पाणी क्षमता चाचणी (Yield Test) केल्याबाबत रक्कम रुपये 5,000/- चे मुल्यांकन नमुद आहे. परंतु क्षमता चाचणी अहवाल नस्तीत जोडण्यात आला नाही. त्यामुळे रक्कम रुपये 5,000/- आक्षेपित ठेवण्यात येत आहे.

3) नस्तीत तपशीलवार अंदाजपत्रक जोडण्यात आले नाही.

### 3.502 सावरी प्रादेशिक नळ योजना विशेष दुरुस्ती.

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** सावरी प्रादेशिक नळ योजना दुरुस्ती या कामावर रुपये 4,52,520/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामाचे अंदाजपत्रक व शेडयुल बी मध्ये बाब क्रमांक 7,8,9 व 10 हे खोदकामाचे आहे. कामाची मोजमाप पुस्तिका क्रमांक 383 तपासली असता, पान क्रमांक 44 ते 45 वर सर्व बाबींची एकत्रित मोजमाप घेण्यात येऊन मुल्यांकनाचा दर 343.8 घेण्यात आला आहे. परंतु रक्कम रुपये 343.8 हा दर अंदाजपत्रकीय तरतुदीत नाही, तरी शेडयुल बी कोणत्या आधारावर घेण्यात आला आहे. याबाबत काहीही नमुद नाही. त्यामुळे अंदाजपत्रकीय तरतुदीशिवाय केलेला खर्च रक्कम रुपये 1,60,135/- लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

2) नस्तीत तपशीलवार अंदाजपत्रक जोडण्यात आले नाही.

### 3.503 कोंड्या महादेव देवस्थान येथे पिण्याचे पाण्याची सुविधा करणे.

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** कोंड्या महादेव देवस्थान येथे पिण्याचे पाण्याची सुविधा करणे या कामावर रुपये 1,18,218/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अर्धसमास पत्र क्रमांक 23 अन्वये सदर कामाचे मोजमाप मुल्यांकन, प्राकलन, निविदा नस्ती, प्रशासकीय मंजुरीची मागणी करुनही सदर अभिलेखे लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेले नाहीत.

2) महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, अधिसुचना मुंबई, दिनांक 11/02/2010 नुसार रुपये 70.70 प्रती घन मीटर प्रमाणे रॉयल्टी कपात करुन शासन खाती जमा करणे आवश्यक आहे. वरील देयकानुसार रुपये 4802/- रॉयल्टीची रक्कम कपात करुन शासन खाती जमा करणे आवश्यक असतांना कंत्राटदारास देयक प्रदान करणे आवश्यक असतांना सदर रक्कम कपात न करताच देयक प्रदान केल्याने रुपये 4802/- वसुलपात्र ठरतात.

3) प्राकलनासोबत दर पृथ्थ्करण विवरणपत्र व बांधकामाकरीता वापरण्यात आलेले साहीत्याची शासकीय प्रयोगशाळेत चाचणी केल्याबाबतचे अहवाल नस्तीत जोडलेले नाही.

**3.504 मौजा कवठाळा, तालुका कोरपना, येथे वाढीव पाणीपुरवठा योजनेचे काम.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** उपरोक्त प्रमाणकाच्या अनुषंगाने डावी-कडवी विचारसरणीग्रस्त अंतर्गत प्राप्त केंद्रीय सहायता निधीमधुन राजुरा उपविभाग अंतर्गत मौजा कवठाळा, येथे वाढीव पाणीपुरवठा योजनेचे कामाच्या नस्तीची तपासणी करण्यात आली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक 16/01/2013 नुसार ई-टेंडरींग करणे आवश्यक असतांनाही त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) वर्तमानपत्रात जाहीरात देऊन काम वाटप केले. परंतु नस्तीत वर्तमानपत्राची प्रत नसल्यामुळे याप्रकारे जाहीरात देऊन काम वाटप केले किंवा कसे ही बाब तपासता आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक संकिर्ण-2009/ प्र.क्र.1794/नवि-20,दिनांक 07/12/2009 नुसार या कामासाठी रुपये 600/- च्या शासकीय मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असतांना रुपये 200/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा केलेला आहे. त्यामुळे रुपये 400/- वसुलपात्र.

4) उपविमा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक प्रविनि-2305/सहविमा/फ-2, दिनांक 04 मार्च 2005 अन्वये कंत्राटी मुल्याच्या एक टक्का रक्कम रुपये 13,845/- कामगारांच्या विम्यापोटी भरणे आवश्यक आहे. परंतु रक्कम भरली नाही.

5) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, निर्णय क्रमांक एआयएफ-2183/सीआर-174/83/ एडीएम-5,दिनांक 16/01/1984 नुसार कामाचा विमा शासकीय विमानिधीकडे उतरविणे आवश्यक आहे. परंतु विमा उतरविला नाही. तसेच कामाच्या एकुण मुल्यांकन रुपये 13,84,452/- च्या 1 टक्का विमा रक्कम रुपये 13,845/- ची कपात करणे आवश्यक असतांना रुपये 10,354/- ची कपात करण्यात आली.त्यामुळे रुपये 3470/- वसुलपात्र आहे.

6) बी-1 निविदा फॉर्मच्या प्रत्येक पृष्ठावर कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परीषद, चंद्रपूर यांची सही नाही.

7) मुळ अंदाजपत्रक लेखापरीक्षणास सादर केले नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परीपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क.44/33, दिनांक 22/12/2000 मधील परीच्छेद क्रमांक 2 नुसार एका कामासाठी एक मोजमाप वही ठेवण्यात यावी असे निर्देश याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. उपयोगिता प्रमाणपत्राची प्रत नस्तीत आढळली नाही.

9) सदर गाव नक्षलग्रस्त असल्याबाबतचे गावाचे पोलीसस्टेशनचे अहवालाची प्रत आवश्यक असतांना तसा अहवाल नस्तीत आढळले नाही.

10) प्रशासकीय मंजुरी अट क्रमांक 6 नुसार काम पुर्ण झाल्यावर अमलबजावणी यंत्रणांनी हे काम संबंधीत विभागाकडे सुपुर्द करुन प्रमाणपत्र घ्यावे असे असतांनाही ग्रामपंचायतीला हस्तांतरीत केल्याचे ताबा पावती नस्तीत नाही.

11) मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता बाब क्रमांक डी (स्टील डोअर) वापरलेले आकार 21.60 स्केअर मीटर असतांना मोजमापपुस्तिकेमध्ये 32.40 स्केअर मिटर घेतले. त्यामुळे अतिरीक्त 10.80 स्केअर मिटर ची रक्कम नियमानुसार वसुल करण्यात यावी.

12) मालमत्ता नोंदवही सादर न केल्यामुळे तपासता आली नाही.

13) सदर कामाचे मंजुर अंदाजपत्रक रुपये 17,78,460/- पैकी रुपये 13,84,453/- म्हणजे 22.15 टक्के कमी खर्च होऊनसुध्दा सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही करण्यात आली नाही.

**3.505 मौजा टेमली, तालुका कोरची येथील विहीर बांधकाम.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** नक्षलग्रस्त भागाच्या विकासासाठी विशेष कृती कार्यक्रमाअंतर्गत मौजा टेमली तालुका कोरची येथील विहीर बांधकामासाठी प्रमाणक क्रमांक 2525, दिनांक 27/03/2015 अन्वये रूपये 6,92,293/- एवढा खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कामपुर्ण झाल्यानंतर विहीरीच्या जवळ छायाचित्र युक्त बोर्ड लावुन त्यावर नक्षलग्रस्त भागाचा जलद विकास कार्यक्रमाअंतर्गत कामाचे नाव, वर्ष असा फलक लावावा असे निर्देश असतांना, 3,013/- एवढा खर्च प्रत्यक्ष केलेल्या कामावर दाखविलेला असुन प्रत्यक्ष छायाचित्रात बोर्ड दिसुन येत नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिप-2009/प्र.क्र.180/पंरास8,दिनांक 30/06/2004 नुसार कामाच्या ठिकाणी नामफलक लावणे आवश्यक असतांना लावलेले नसल्याने शासन निर्णयाचे पालन विभागाने केलेले नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 118 व 153(1) अन्वये अंदाजपत्रकाप्रमाणे काम होणे आवश्यक असतांना तसेच कामात बदल करावयाचा असल्यास कार्यकारी अभियंता ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद गडचिरोली यांची पुर्वपरवानगी होणे आवश्यक आहे. तसेच बी-1 अट क्रमांक 38 (1) नुसार 25 टक्केपेक्षा जादा बाबनिहाय कामे करता येणार नाहीत. असे असतांना देखील अंदाजपत्रकीय बाबीपेक्षा 25 टक्के पेक्षा जादा परिणाम दर्शवुन जादा खर्च केलेला आहे. तरी बाबनिहाय जादा खर्च रक्कम रूपये 30,453/- मान्य करता येत नाही.

**3.506 पाणीपुरवठा योजना बिलोणी तालुका वैजापूर कामामधील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदर योजनेवर रक्कम रुपये 14,00,877/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरील कामाची ई- निविदा मागविण्यात आलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन परिपत्रक दिनांक 07/12/2009 अन्वये करारनामा करातांना रुपये 4,700/- ऐवजी रुपये 100/- मुद्रांक शुल्क घेण्यात आले आहे.

3) योजना विलंबाने पूर्ण केल्यामुळे दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) भूवैज्ञानिक यांचा पाणी आवक चाचणी अहवाल व यील्ड टेस्ट रिपोर्ट संचिकेत नाही.

5) योजनेच्या उपांगासाठी लागणारी जमीन ग्रामपंचायतीच्या ताब्यात असलेबाबतचे अभिलेखे संचिकेत नाही.

6) जलकुंभ बांधकामाची आरसीसी संकलने यांची तपासणी व मंजूरी तांत्रिक सक्षम अधिका-याकडून झाल्याचे दिसत नाही. तसेच पायाकरीता सुरक्षित भार क्षमता कार्यकारी अभियंता यांनी प्रमाणित केलेली नाही.

7) कामाच्या दरम्यान विविध उपशाच्या खोदकामाचा स्तर कार्यकारी अभियंता यांनी तपासल्याचे दिसत नाही.

8) क्वारी चार्ट हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रमाणित करून घेतलेले नाहीत.

9) पाण्यात नायट्रेटचे प्रमाण कमाल मर्यादेच्या जवळ आहे. विभागाने यावर उपाययोजना केलेल्या नाहीत.

10) दर पृथ:करणात गौणखनिज स्वामित्वधनाचा समावेश केलेला नाही. तसेच देयकातून कामगार कल्याण उपकर वसूल केलेला नाही.

**3.507 पाणीपुरवठा योजना वरुडकाझी तालुका औरंगाबाद कामामधील अनियमिततेबाबत**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदर योजनेवर रक्कम रुपये 55,51,760/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन परिपत्रक दिनांक 07/12/2009 अन्वये करारनामा करातांना रक्कम रुपये 21,700/- ऐवजी रुपये 100/- मुद्रांक शुल्क घेण्यात आले आहे.

2) उदभव विहीरीचे बांधकामासाठी पाटबंधारे खात्याची परवानगी घेणेत आलेली नाही.

3) उदभव विहीरीवर बांधण्यात आलेला ॲप्रोच बांधच्या उंची बाबत व बाजूस पिचींग न केल्याबाबत कार्यकारी अभियंता यांनी अभिप्राय दिला असतांना यावर कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

4) सदरील कामाची ई- निविदा मागविण्यात आलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन परिपत्रक दिनांक 17/06/2010 अन्वये 1 टक्के कामगार कल्याण उपकर व स्वामित्वधनाची रक्कम वसुल करणेत आलेला नाही.

**3.508 पाणीपुरवठा योजना संजरपूर तालुका गंगापूर कामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदर योजनेवर रक्कम रुपये 8,13,527/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन परिपत्रक दिनांक 07/12/2009 अन्वये करारनामा करातांना रुपये 1,600/- ऐवजी रुपये 50/- मुद्रांक शुल्क घेण्यात आले आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 148 अन्वये ठेकेदाराने मुदतवाढीसाठी विहित कालावधीत अर्ज केलेला नाही.

3) उर्जा व कामगार विभाग परिपत्रक दिनांक 17/06/2010 अन्वये 1 टक्का कामगार कल्याण उपकर वसूल करणेत आलेला नाही.

4) दर पृथ:करण करतांना गौणखनिज स्वामित्वधनाचा समावेश केला नसल्याने शासनाच्या गौणखनिज स्वामित्वधनाचे नुकसान झाले आहे.

5) उदभव विहीर, स्वीचरुमची जागा, निर्विवाद असलेबाबतचे प्रमाणपत्र घेतलेले नाही.

6) कामाबाबत त्रिस्तरीय करारनामा अपुर्ण आहे.

7) उदभव विहीरीतील पाण्याचा जैविक तपासणी अहवाल घेतलेला नाही.

8) संचिकेत पूर्ण झालेल्या विहीरीच्या फोटो मध्ये विहिरीतील पाणी दिसत नाही. त्यामुळे झालेला खर्च निष्फळ झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

9) विहिरीबाबतच्या जागेचे दानपत्र नोंदणीकृत नाही.

10) योजनेची जागा निर्विवाद व समितीच्या नावे असल्याबाबत अभिलेखे संचिकेत नाहीत.

**3.509 पाणीपुरवठा योजना मौ.सिध्दपूर तालुका गंगापूर कामामधील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** सदर योजनेवर रक्कम रुपये 34,21,375/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) योजना विलंबाने कार्यान्वित केल्याबाबत समाधानकारक अभिलेखे संचिकेत नाहीत.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 148 अन्वये ठेकेदाराने मुदतवाढीसाठी विहित कालावधीत अर्ज केलेला नाही.

3) योजनेच्या दर पृथ:करणात गौणखनिज स्वामित्वधनाचा समावेश असतांना देयकातून तशी कपात केलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन परिपत्रक दिनांक 07/12/2009 अन्वये करारनामा करातांना रुपये 1,600/- मुद्रांक शुल्क घेणे आवश्यक होते.

5) उर्जा व कामगार विभाग परिपत्रक दिनांक 17/06/2010 अन्वये 1 टक्का कामगार उपकर वसूल केलेला नाही.

6) शासन निर्णय दिनांक 11/01/2014 नुसार योजना हागणदारी मुक्तीच्या अटींची पूर्तता केलेली नाही.

7) शासन परिपत्रक दिनांक 18/03/2008 मधील परि.11 नुसार योजनेचे वेळापत्रक पाळलेले नाही.

8) पाणी तपासणी अहवाल व पाणी स्त्रोत उपलब्धतेबाबत भूवैज्ञानिक यांचा अहवाल संचिकेत नाही.

9) पाईपचा त्रयस्थ संस्थेचा तपासणी अहवाल व हायड्रॉलीक तपासणी अहवाल संचिकेत नाही.

10) वितरण व्यवस्थेकरीता अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा केलेल्या जास्तीच्या खर्चास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आलेली नाही.

**3.510 पाणीपुरवठा योजना दादेगांव तालुका पैठण कामामधील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** सदर योजनेवर रक्कम रुपये 28,49,580/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कामाची निविदा ई निविदा प्रक्रिया पार पाडतांना अनामत रक्कम व निविदा रक्कम एनईएफटी व्दारे जमा न करता पारंपारीक पध्दतीने जमा करण्यात आली आहे.

2) शासन निर्णय दिनांक 11/01/2014 नुसार हागणदारी मुक्तीच्या अटींची पूर्तता केलेली नाही.

3) योजनेच्या दर पृथ:करणात गौणखनिज स्वामित्वधनाचा समावेश केलेला असतांना देयकातून तशी कपात केलेली नाही.

4) योजनेचे उदभवास संबंधित विभागाचे ना हरकत किंवा परवानगी घेतलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन परिपत्रक दिनांक 07/12/2009 अन्वये करारनामा करातांना रक्कम रुपये 9,300/- ऐवजी रुपये 100/- मुद्रांक शुल्क घेण्यात आले आहे.

6) उर्जा व कामगार विभागाचे परिपत्रक दिनांक 17/06/2010 अन्वये 1 टक्का कामगार कल्याण उपकर वसूल करणेत आलेला नाही.

**3.511 मौजे कुंभारझरी तालुका जाफ्राबाद येथे 10 टक्के लोक सहभागावर राष्ट्रीय पेयजल पाणीपुरवठा योजनेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदर योजनेवर रुपये 3,59,009/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रस्तुत कामाचा करारनामा संचिकेत तपासणीकरीता उपलब्ध झाला नाही ही गंभीर बाब असून महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2009प्र.क्र.1794/20, दिनांक 07/12/2009 नूसार रुपये 10 लक्ष कंत्राटासाठी रुपये 100/- व त्यापुढील प्रत्येक लाखास रुपये 100/- प्रमाणे मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे त्यानूसार याठिकाणी रुपये 1500/- करारनामा रक्कम वसूलात आणावी.

2) सदरील कामाबाबत मोजमाप पुस्तीकेतील पृष्ठ क्र. 2 ते 6 मधील नोंदी प्रत्यक्ष मोजमाप गोषवारा मधील मोजमापे यात पढील प्रमाणे विसंगती आढळून आली आहे.

जादा अदाईची रक्कम रुपये 5,895/- वसूलात आणून अनुपालन करावे.

3) शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्रमांक पंरास/1088/सीआर/3041/26, दिनाक 04/01/1988 अन्वये जो पर्यंत कामाची जागा जिल्हा परिषदेच्या मालकीची कोणतेही अभिलेखे संचिकेत दिसून आले नाहीत.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 नूसार खरेदी साहित्याच्या दर्जाची प्रयोगशाळेकडून तपासणी करुन विहीत गुणवत्तेची खात्री करण्यात आली नाही.

5) तांत्रिक मंजूरी आदेशातील अटीनूसार व महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक व्हीपीएस 1099/प्र.क्र.54/08 मंत्रालय मुंबई,दिनांक 20/05/1999 अन्वये कामाच्या ठिकाणी माहीती फलक लावणे आवश्यक आहे. परंतु माहिती फलक लावण्यात आलेला नाही.

6) आर्थिक मान्यता व कार्यारंभ आदेशातील अटी व शर्तीनूसार सदरचे काम दिनांक 25/06/2014 पर्यंत पूर्ण करणे आवश्यक होते.परंतु काम पुर्ण झालेले नाही. याबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 148 नूसार मुदतवाढ घेण्यात आलेली नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, शासन निर्णय क्रमाक 1000/प्र.क्र./ 90/पापु07,दिनांक 03/09/2001 तसेच आर्थिक मान्यता आदेशातील अट क्रमांक 9 नूसार समिती मार्फत रुपये 1,000/- व त्यावरील

केलेल्या खर्चाची अदाई रेखांकित धनादेशाने न करता ती रोखीने अदा केलेली आहे. त्यामूळे प्रस्तुत प्रकरणी गंभीर वित्तीय अनियमितता झाली आहे.

8) अध्यक्ष पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने अग्रिम रक्कमा प्राप्त झाल्याबाबत नमुना नं. 7 च्या सामान्य पावत्या विभागास सादर केलेल्या नाहीत.

9) शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2000/प्र.क्र.24/33,दिनांक 22/12/2000 नूसार कामाची मोजमाप पुस्तिका नोंदविणारा अभियंता, तपासणी करणारा उपअभियंता तसेच कार्यकारी अभियंता यांनी दिनांकित स्वाक्षरी केली नाही.

10) लेखासंहिता नियम 1968 चे नियम 161(1) नूसार कार्यकारी अभियंता ग्रामिण पाणीपुरवठा जालना यांनी 5 टक्के कामाची तपासणी करुन दिनांकित स्वाक्षरी करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

11) महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग शासन निर्णय दिनांक 15/12/2006 तसेच शासन निर्णय दिनांक 11/02/2010 नूसार गौणखनिजाची वसुली करण्यात आलेली नाही.

12) महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक बीजीडी 2005/प्र.क्र.324/इमारत-2,दिनांक 03/03/2006 नूसार अनोंदणीकृत ठेकेदाराकडून 4 टक्के मुल्यवर्धीत कर वसूल करणे आवश्यक असतांना ठेकेदाराकडून 2 टक्के प्रमाणे मुल्यवर्धीत कर वसूल केलेला आहे तरी कमी वसूल केलेला मुल्यवर्धीत कर रुपये 7,180/- वसूल करणे आवश्यक आहे.

13) तांत्रिक मान्यता आदेश तसेच शासन निर्णय ग्रामिण पाणी पुरवठा क्रमांक ग्रापायो-1113 प्र.क्र.156/पापु-7, दिनांक 22/01/2014 अन्वये गांव 100 टक्के हांगणदारीमुक्त झाल्याचा अहवाल प्राप्त न करताच उपरोक्त प्रमाणकान्वये दिलेले अग्रिम नियमबाहय आहे.

14) समितीने कामासाठी लागणाऱ्या साहित्याची खरेदी हे शासन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अथवा जिल्हापरिषद मान्यताप्राप्त यादीतील उत्पादक / पुरवठादाकडून भारतीय मानक संस्थेच्या निकषानूसार प्रमाणिक असलेल्या स्पेसिफीकेशन नूसार केलेली नाही.

15) अंदाजपत्रक स्थळ पाहणी करुन ज्या ज्या वेळी जे जे काम केले त्याची दिनांकासह नोंदी ठेवणे क्षेत्रिय पुस्तिका, लेव्हल बुक सादर करणे आवश्यक आहे.

16) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 100 प्रमाणे प्रस्तुत कामाची नोंद नमुना नंबर 42 प्रकल्प नोंद नमुना नं. 42 प्रकल्प नोंदवहीमध्ये ठेवणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही झालेली नाही.

17) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 197 प्रमाणे पाणीपुरवठा योजना पुर्ण झालेल्या कामाची नोंद नमुना नं. 69 मध्ये ठेवणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही झालेली नाही.

18) कामाची मोजमापे मान्य असलेबाबत मोजमाप पुस्तिकेत ठेकेदाराची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही.

19) सार्वजनिक बांधकाम विभाग नियम पुस्तिका 1984 मधील परिशिष्ट क्रमांक 24 (13 व 15) नूसार देयकांचे प्रदानाचे वेळी मोजमाप पुस्तिकेतील नोंदी लाल शाईने रद्द करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही.

20) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 147 अन्वये प्रत्येक करार नमुना क्र. 48 मधील नोंदवहीत नोंदवून व कंत्राटदाराच्या दिलेल्या रक्कमेची नोंद ही नोंदवहीत करणे आवश्यक असतांना नमुना नं.48 ठेवणेत येऊन कराराच्या नोंदी घेतलेल्या नाहीत.

21) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 67 नूसार कामाच्या प्रगतीची नोंद नमुना नं. 23 मध्ये घेणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झालेली नाही.

22) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दिनांक 08/05/2007 नूसार कंत्राटदाराकडून इसारा रक्कम भरणे बंधनकारक असतांना तशी कार्यवाही केलेला नाही.

**3.512 मौजे घुंगर्डे हादगांव तालुका अंबड येथे नळाव्दारे पाणीपुरवठा योजनेतील अनियमिततेबाबत कामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदर योजनेवर रुपये 33,93,696/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रस्तुत कामाची अंदाजपत्रक रक्कम रुपये 1 कोटीहून अधिक असल्याने त्यास अधिक्षक अभियंता यांची तांत्रिक मंजूरी घेतली आहे व प्रशासकीय मान्यतेपुर्वीच तांत्रिक मंजूरी घेतली आहे.

2) शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2000/प्र.क्र.24/33,दिनांक 22/12/2000 नूसार कामाची मोजमाप पुस्तिका नोंदविणारा अभियंता, तपासणी करणारा उपअभियंता तसेच कार्यकारी अभियंता यांनी दिनांकित स्वाक्षरी केलेली नाही.

3) ग्रामीण पुरवठा व स्वच्छता समितीच्या खात्यावर जमा झालेल्या व्याजाची रक्कम ही योजनेवरील कामाचा भाग असल्याने, समितीकडून वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक ग्रापायो/1108/प्र.क्र.32/पा.पु.07, दिनांक 18/03/2008 मधील परिच्छेद क्रमांक 11 व 13 नूसार विहीत वेळापत्रकानूसार योजनेची कामे करावयाची आहेत. त्याप्रमाणे विहीत वेळेत कामे पुर्ण झालेली नाहीत. यावरुन नियंत्रणाचा अभाव दिसून येतो.

5) महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक 18/03/2008 मधील अ.क्र.6 प्रमाणे योजनेची कामे गुणवत्ता पुर्वक व विहीत मुदतीत पुर्ण झाली पाहिजेत. या नूसार कार्यवाही झालेली नाही.

6) प्रस्तुत कामाचा रुपये 200/- च्या मुद्रांकावर करारनामा करुन घेण्यात आलेला आहे. परंतू त्यावर करार केल्याचा दिनांकच नमूद नसल्यामूळे केलेला करारनामा वैध ठरत नाही.

प्रस्तुत कामाचा करारनामा संचिकेत तपासणीकरीता उपलब्ध झाला नाही ही गंभीर बाब असून महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2009 प्र.क्र.1794/20, दिनांक 07/12/2009 नूसार रुपये 10 लक्ष कंत्राटासाठी रुपये 100/- व त्यापुढील प्रत्येक लाखास रुपये 100/- प्रमाणे मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे. त्यानूसार याठिकाणी रुपये 12,000/- करारनामा रक्कम वसूलात आणावी.

7) शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्र.पंरास/1088/सीआर/3041/26,दिनांक 04/01/1988 अन्वये जो पर्यंत कामाची जागा जिल्हा परिषदेच्या मालकीची कोणतेही अभिलेखे संचिकेत दिसून आले नाहीत.

8) महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, शासन निर्णय दिनांक 15/12/2006 तसेच शासन निर्णय दिनांक 11/02/2010 नूसार रॉयल्टीची परिगणना करुन रक्कम वसूल करुन शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

9) लेखासंहिता नियम 1968 चे नियम 161(1) नूसार कार्यकारी अभियंता ग्रामिण पाणीपुरवठा जालना यांनी 5 टक्के कामाची तपासणी करुन दिनांकित स्वाक्षरी करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

10) अध्यक्ष पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने अग्रिम रक्कम प्राप्त झाल्याबाबत नमुना नं. 7 च्या पावत्या विभागास सादर केल्या नाहीत.

11) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 67 नूसार कामाच्या प्रगतीची नोंद नमुना नं. 23 मध्ये घेणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झालेली नाही.

12) महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 124 नूसार बांधकामाचे आदेश पुस्तक ठेवण्यात आले नाही.

13) अंदाजपत्रक स्थळ पाहणी करुन ज्या ज्या वेळी जे जे काम केले त्याची दिनांकासह नोंदी ठेवणे क्षेत्रीय पुस्तिका, लेव्हल बुक सादर करणे आवश्यक आहे.

14) कामाची मोजमापे मान्य असलेबाबत मोजमाप पुस्तिकेत ठेकेदाराची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही.

15) सार्वजनिक बांधकाम विभाग नियम पुस्तिका 1984 मधील परिशिष्ट क्रमांक 24 (13 व 15) नूसार देयकांचे प्रदानाचे वेळी मोजमाप पुस्तिकेतील नोंदी लाल शाईने रद्द करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही.

16) तांत्रिक मान्यता आदेश तसेच शासन निर्णय, ग्रामिण पाणी पुरवठा क्रमांक ग्रापायो-1113प्र.क्र.156/पापु-7,दिनांक 22/01/2014 अन्वये गांव 50 टक्के हांगणदारीमुक्त झाल्याशिवाय कामाचा 2 रा हप्ता देता येत नाही. गट विकास अधिकारी यांचेकडून 100 टक्के हागणदारीमुक्त झाल्याचा अहवाल प्राप्त न करताच उपरोक्त प्रमाणकान्वये दिलेले अग्रिम नियमबाहय आहे.

17) प्रस्तुत कामाचे मोजमाप पुस्तिकेत 2500 बीएचपी पाणी उपसा करीता रुपये 60/- दराने रुपये 1,50,000/- ची अदाई करण्यात आली आहे. परंतू प्रस्तुत प्रकरणी लॉगबुक न ठेवल्यामुळे उक्त रक्कमेचा पाणी उपसा केले बाबत लेखापरीक्षणाची खात्री होत नाही.

**3.513 मौजे बाचेगांव तालुका घनसावंगी येथे नळाव्दारे पाणीपुरवठा योजनेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदर योजनेवर रुपये 10,38,756/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 153(1) नूसार गुत्तेदाराने मान्य केलेल्या शेडयूल ब नूसार काम न करता जास्त बाबींचे काम केले. निविदेतील अटी व शर्तीनूसार तसेच गुत्तेदाराने मान्य केल्याप्रमाणे जादा परिमाणाचे काम केल्याने प्रदान रुपये 8,325/- वसूल करणे आवाश्यक आहे.

2) प्रस्तुत कामाचा मुद्रांकपेपरवर करारनामा करुन घेण्यात आलेला आहे. परंतू त्यावर करार केल्याचा दिनांकच नमूद नसल्यामूळे केलेला करारनामा वैध ठरत नाही.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2009 प्र.क्र.1794/20,दिनांक 07/12/2009 नूसार रुपये रुपये 3,200/- करारनामा रक्कम वसूल करणे आवाश्यक आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 नूसार खरेदी साहित्याच्या दर्जाची प्रयोगशाळेकडून तपासणी करुन विहीत गुणवत्तेची खात्री करण्यात आली नाही.

4) महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, शासन निर्णय दिनांक 15/12/2006 तसेच शासन निर्णय दिनांक 11/02/2010 नूसार रॉयल्टीची परिगणना करुन रक्कम वसूल करुन शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

5) लेखासंहिता नियम 1968 चे नियम 161 (1) नूसार कार्यकारी अभियंता ग्रामिण पाणीपुरवठा जालना यांनी 5 टक्के कामाची तपासणी करुन दिनांकित स्वाक्षरी करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

6) शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2000/प्र.क्र.24/33,दिनांक 22/12/2000 नूसार कामाची मोजमाप पुस्तिका नोंदविणारा अभियंता, तपासणी करणारा उपअभियंता तसेच कार्यकारी अभियंता यांनी दिनांकित स्वाक्षरी करणे अनिवार्य आहे मात्र अशी कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही. याबाबत दैनंदिनी दर्शवून केलेली नोंदणी व दिनांक निहाय तपासणी याबाबत अनूपालन करावे.

7) अध्यक्ष पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने अग्रिम रक्कमा प्राप्त झाल्याबाबत नमुना नं.7 च्या सामान्य पावत्या विभागास सादर केलेल्या नाहीत.

8) सदरचे काम दिनांक 25/06/2014 पर्यंत पूर्ण करणे आवश्यक असतांना त्या प्रमाणे काम पूर्ण आले नाही. याबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 148 नूसार मुदत वाढ घेण्यात आलेली नाही.

9) तांत्रिक मंजूरी आदेशातील अटीनूसार व महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक व्हीपीएस 1099/प्र.क्र.54/08 मंत्रालय मुंबई,दिनांक 20/05/1999 अन्वये माहिती फलक लावण्यात आलेला नाही.

**3.514 बांधकामातील विहित शासकीय कपाती न करणेबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद बीड, विविध 183 पाणी पुरवठा योजनेचे कामाची देयके अदा करतांना बांधकाम उपकर, कामाचा विमा, मुल्यवर्धित कर आणि आयकर इत्यादी च्या कपाती केलेल्या नाहीत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन परिपत्रक क्रमांक बीसीए-12007/ प्र.क्र.788 /कामगार 7 दिनांक 21 एप्रिल 2008 नुसार बांधकाम उपकर 1 टक्का वसुल करणे आवश्यक आहे, परंतु सन 2014-2015 च्या कामामध्ये बांधकाम उपकर कमी कपात केला असल्याने रुपये 7,12,767/- संबंधीतांकडुन वसुलपात्र ठरतात.

2) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास/1098-प्र.क्र.2889 दिनांक 19 ऑगस्ट 1998 अन्वये 1 टक्के दराने कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे, परंतु सन 2014-2015 च्या कामामध्ये बांधकामाचा विमा न उतरविल्यामुळे विम्याची रक्कम रुपये 7,13,214/- संबंधीतांकडून वसुलपात्र ठरते.

3) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक 04 मे 2012 च्या अधिसुचनेनुसार मुल्यवर्धीत कर हा 5 टक्के कपात करणे आवश्यक आहे, परंतु सन 2014-2015 च्या देयकामधुन रक्कम रुपये 48,28,924/- इतका कमी कपात केला आहे. सदर रक्कम संबंधीतांकडून वसुलपात्र ठरते.

4) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) नुसार कंत्राटदाराकडून 2% दराने आयकर कपात करणे आवश्यक आहे, परंतु सन 2014-2015 च्या देयकामधून आयकर कमी कपात केल्याने रक्कम रुपये 18,54,051/- संबंधीतांकडून वसूलपात्र ठरते.

**3.515 सेवाशुल्कातुन केलेल्या नियमबाहय खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** 2 टक्के प्रकल्प व्यवस्थापन व 5 टक्के तांत्रिक सल्ला यासाठीची रक्कम विभागा मार्फत कपात करण्यात येते. सदर रक्कम विभागाने खर्च केली आहे, परंतु खर्च केलेल्या रक्कमेपैकी रक्कम रुपये 15,05,454/- चे उपप्रमाणके लेखापरिक्षणास उपलब्ध करुन दिले नाहीत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-1109/प्र.क्र.115/पापु-07 दिनांक 09/09/2009 नुसार सेवाशुल्क निधीतुन करावयाचे खर्च निश्चित केले आहेत, त्याव्यतीरिक्त करावयाच्या खर्चास शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे, परंतु सदर शासन निर्णयान्वये ठरवुन दिलेले खर्च न करता अन्य बाबीवर खर्च करण्यात आलेला आहे व त्यास शासनाची मान्यता घेतलेली नाही.

2) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई जावक क्रमांक ग्रापाधो-1111 /प्र.क्र.062/पापु07 दिनांक 24/04/2011 नुसार सदर निधी मधुन कंत्राटी अभियंत्याचे वेतन व प्रवास भत्ता देयके अदा करणे आवश्यक आहे.

3) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांचे पत्र क्रमांक जा.क्र.4297 दिनांक 28/10/2013 नुसार ग्रामिण पाणी पुरवठा विभागांतर्गत वाहनासाठी इंधन, वंगण आणि दुरुस्ती याबाबतचा खर्च करणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे, परंतु त्यास लेखा परिक्षण दिनांकापर्यंत मंजुरी मिळालेली नाही. सन 2014-2015 मध्ये सेवाशुल्क निधी मधुन वाहनावर रुपये 8,47,656/- इतका खर्च नियमबाह्य केला आहे, सदर खर्च वसुलपात्र आहे.

4) शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-1111/प्र.क्र134/पापु 07 दिनांक 20/02/2015 नुसार कनिष्ठ अभियंत्याचे मानधन व इतर भत्त्याव्यतिरीक्त खर्चास शासनाची मान्यता असणे आवश्यक आहे.

5) ग्रामपंचायत बनसारोळा, तालुका केज येथील पाणी पुरवठा योजनेसाठी सेवाशुल्क निधीमधुन रुपये 23,89,000/- चे अग्रिम प्रदान केले आहे, सदर बाब नियमबाहय आहे.

6) अर्धसमास पत्र क्रमांक 01 दिनांक 07/09/2016, अर्धसमास पत्र क्रमांक 02 दिनांक 08/09/2016, अर्धसमास पत्र क्रमांक 03 दिनांक 12/09/2016 व अर्धसमास पत्र क्रमांक 05 दिनांक 14/09/2016 अन्वये सेवाशुल्क निधीतुन केलेल्या खर्चाच्या प्रमाणकाचे मागणी करुनही रुपये 15,05,554/- इतक्या रकमेचे प्रमाणके लेखापरिक्षणास उपलब्ध केलेले नाहीत.

### 3.516 ग्रामिण पाणी पुरवठा विभागातील विविध योजनेत झालेल्या अपहाराबाबत.

**जिल्हा परिषद बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** ग्रामिण पाणी पुरवठा विभागांतर्गत ग्रामिण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मार्फत राबविण्यात आलेल्या योजनेमध्ये दिलेल्या अनुदानाचा अपहार झाल्याचे लेखापरिक्षणामध्ये निदर्शनास आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, परिपत्रक क्रमांक गस्वप्र/2007/वित्तीय सल्लागार/प्र.क्र.1/पापू11 दिनांक 06 डिसेंबर 2007 अन्वये नळ पाणी पुरवठा योजना राबविण्यासाठी प्राप्त शासकीय अनुदान व लोक वर्गणी यामध्ये काम न करता निधी आहरीत केला आहे. सदर सुचनांचे पालन करण्याची जबाबदारी संबंधीत अधिकारी यांची असताना समितीने अपहार करुन देखील त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक क्रमांक ग्रापायो-1108 /प्र.क्र.32/पापू07 दिनांक 18/03/2008 परिच्छेद क्रमांक 8 नुसार कामाचे तीन टप्पे पाहुनच अनुदानाचे वाटप करण्यात येईल असे असताना त्या त्या टप्प्यातील काम पुर्ण झाले तरच दूसऱ्या टप्प्याचा हप्ता देण्यात येईल. परंतु, सदरील टप्प्याचे काम पुर्ण झालेले नसताना दुसऱ्या टप्प्याचे अनुदान वितरीत केलेले आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नुसार (1)36नुसार जिल्हा परिषद पंचायत समितीच्या अपहार, गैरव्यवहार, याबाबतची माहिती संवैधानिक लेखा परिक्षकास सादर करणे आवश्यक आहे, तसेच नियम 36(2) अन्वये चौकशी पुर्ण झाल्याचा अहवाल विभागीय आयुक्त यांना कळविणे आवश्यक आहे. एकुण 43 समित्यांवर झालेल्या अपहारा मध्ये रुपये 4,51,78,227/- इतक्या रकमेचे शासनाचे नुकसान झाले आहे. सदर रक्कम 18 महिन्यामध्ये काम पुर्ण करुन खर्च करणे आवश्यक होते.

4) पाणी पुरवठा योजनेच्या निधीचा गैरवापर केल्या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांचे पत्र क्रमांक जा.क्र.ग्रापापूवि/जिपबीड/काअ/3061 दिनांक 25/10/2012 अन्वये संबंधीत समितीचे अध्यक्ष व सचिव यांचे 7/12 वर अपहारीत रक्कमेचा बोजा टाकणेबाबत सुचित केले आहे, परंतु अशी कार्यवाही केलेली नाही.

### 3.517 योजना नूतनीकरण निधी कामातील अनियमितताबाबत.

**जिल्हा परिषद परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** ग्रामीण पाणीपूरवठा विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांनी सन 2014-15 मध्ये योजना नूतनीकरण निधी (ARF) या योजनेवर निवडक महिन्यांत विभिन्न कामांवर रूपये 21,97,179/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पाणीपूरवठा व स्वच्छता विभाग, शासन परीपत्रक क्रमांक ग्रापाधो-1111/प्र.क्र.50/पापू-07,दिनांक 20/04/2012 मधील अनुक्रमांक 1 अन्वये 15 वर्षापेक्षा जास्त जून्या पाईपलाईन्स व 5 वर्षापेक्षा जास्त कालावधीच्या पंपींग मशिनरी नादूरूस्ती असलेल्या योजनेची दूरूस्तीचे कामे हाती घेता येतील असे नमूद आहे. महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 मधील नियम 67 अन्वये विभागाने खर्चाच्या अनूषंगाने नमूना नंबर 23 मध्ये बांधकाम योजनांच्या प्रगतीची नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतू विभागाने अशी नोंदवही न ठेवल्यामूळे सन 2014-15 मध्ये दूरूस्त केलेल्या योजना कोणत्या वर्षी पूर्ण केल्या होत्या, त्यावर किती खर्च केला होता व या पूर्वी दूरूस्तीवर किती खर्च केला, याबाबत बोध होत नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 मधील नियम 168 (1) प्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी त्यांनी विहीत केलेल्या प्रमाणात कामाची तपासणी केल्याचे दिसून आले नाही. तसेच परीपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/33,दिनांक 22/12/2000 नूसार शाखा अभियंता यांनी मापन पूस्तीकेत नोंदी घेतल्यानंतर दिनांकीत स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतू संबंधितांनी नोंदीबाबत दिनांकीत स्वाक्षरी केलेली दिसून आली नाही..

3) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बीडीजी-2005/प्र.क्र.324/इमारती-2,दिनांक 03/03/2006 तथा सूधारीत महाराष्ट्र शासन, राजपत्र, दिनांक 04/04/2012 प्रमाणे मूल्यवर्धीत कर अधीनियमाखाली नोंदणी झालेल्या कंत्राटदाराच्या देयकातून करार किमतीच्या 2 टक्के व नोंदणी न केलेल्या ठेकेदाराच्या कामाच्या देयकातून 5 टक्के मूल्यवर्धीत कर कपात करणे आवश्यक असतांना विभागाने केलेल्या

कामाच्या 4 टक्के दराने कर कपात केलेला आहे. त्यामूळे रूपये 28,116/- मूल्यवर्धीत कर कमी कपात करण्यात आलेला आहे.

4) महाराष्ट्र शासन, उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, परीपत्रक क्रमांक बीसीए-2007/ प्र.क्र.788/कामगार-7,दिनांक 26/10/2009 अन्वये दिनांक 01/11/2009 पासून 1 टक्के उपकर वसूल करणे आवश्यक आहे. तरी कामाचे मूल्यांकन रूपये 4,99,371/- चे 1 टक्के रक्कम रूपये 4,993/- असताना केवळ रूपये 2,471/- कपात केलेला आहे. त्यामूळे रूपये 2,522/- कमी कपात केले आहे.

5) शासन निर्णय क्रमांक जिवर-2000/प्र.क्र.837/35, दिनांक 08/05/2002 अन्वये व विमा संचालक, महाराष्ट राज्य, मूंबई यांचे पत्र क्रमांक प्रविसी-2303/सहविमा/जिप/संकीर्ण/ अभियांत्रिकी/एम-2,दिनांक 27/06/2003 व विमा संचालक, महाराष्ट्र राज्य, मूंबई यांचे पत्र क्रमांक प्रविनी-1801/सिआर/जिप/संकीर्ण,दिनांक 30/07/2008 अन्वये कंत्राटी कामास प्रारंभ करण्यापूर्वी संबंधीत कंत्राटदाराने कंत्राटी मूल्याच्या शेकडा 100 पैसे दराने कामाचा विमा योग्य विमापत्राखाली शासकीय विमानिधीच्या अनूमतीने अन्य विमा कंपनीकडे उतरविला, याची खात्री करावी, असे स्पष्ट नमूद आहे. असे असतांना कामाचे मूल्यांकन रूपये 4,99,371/- चे 1 टक्के रक्कम रूपये 4,993/- असताना केवळ रूपये 2,471/- उपकर कपात केलेला आहे. त्यामूळे रूपये 2,522/- कमी कपात केले आहे.

6) जिल्हा परीषदेने करारनामा विहीत कालावधीत काम पूर्ण न केल्यास दंडाबाबत अटी व शर्ती टाकल्या नाहीत. मौजे कोळवाडी, मौजे शिर्शी बु. तालुका पालम, मौजे कुडा तालुका सेलू यांनी विहीत कालावधीत काम पूर्ण केली नाहीत. या कामासाठी कंत्राटदारांनी मूदतवाढीसाठी अर्ज केल्याचे व जिल्हा परीषदेने मूदतवाढ दिल्याचे पत्र संचिकेत आढळून आले नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 183 (3) नूसार दूबार अदाई होवू नये म्हणून झालेल्या कामाची अंतिम अदायी केल्यानंतर मोजमाप पूस्तीके मधील नोंदी लाल शाईने क्रॉस करून खोडावयास पाहीजे, तथापि अशी कार्यवाही झालेली नाही.

8) सदरील दूरूस्तीची कामे इतर योजनेतून झाली नसल्याची अभिलेख्या अभावी तपासणी करता आली नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 197 अन्वये नमूना नंबर 69 मध्ये पूर्ण झालेल्या बांधकामाची नोंदवही ठेवून त्यामध्ये विहीत नोंदी घेणे आवश्यक असतांना अशी नोंदवही ठेवलेली नाही.

**3.518 विशेष घटक योजने अंतर्गत विंधन विहिरी घेणे कामांमधील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** ग्रामिण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांनी सन 2014-15 मध्ये प्राथमिक शाळामध्ये पाणी पुरवठ्याच्या सोयी निर्माण करणे योजने अंतर्गत 31 विंधन विहिरी घेण्यावर रुपये 10,52,791/- खर्च नोंदवल्याचे आढळुन आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरील कामाच्या निविदा मंजुरीसाठी अध्यक्ष, जल व्यवस्थापन समिती, जिल्हा परिषद, परभणी यांचा ठराव असणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/वित्त-9,दिनांक 19/03/2012 मधील टिप एक नुसार सदरील मान्यतेची माहिती विषय समितीस सादर करणेसुद्धा आवश्यक आहे. अशी कार्यवाही केल्याचे दिसुन आले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.444/वित्त-9,दिनांक 15/07/2008, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/वित्त-9,दिनांक 19/03/2012 तथा शुध्दीपत्रक दिनांक 23/07/2012 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/वित्त-9,दिनांक 31/01/2013 मधील टिप दोन नुसार जिल्हा परिषदेतील विभागाने कामांच्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल

जिल्हा परिषदेच्या आगामी सर्वसाधारण सभेत सादर करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झाल्याचे दिसुन आले नाही.

3) ज्या ठिकाणी विंधन विहीर घ्यावयाची आहे, त्या प्रत्येक ठिकाणचे सर्वेक्षण, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांच्याकडून होणे आवश्यक आहे.या यंत्रणेच्या अनुकूल अहवालानंतरच त्या ठिकाणी विंधन विहीरीचे काम हाती घेता येते.विभागाने सदर यंत्रणेकडून अनुकुल अहवाल तर घेतलेला आहे,परंतु अहवालासोबत जोडलेल्या नकाशामध्ये अंतर, दिशा, आजुबाजुचे प्रमुख landmark, सर्वेक्षणाचा दिनांक यांपैकी कशाचाच समावेश नाही. म्हणून त्यावरून कसलाही बोध होत नाही. केवळ औपचारिकता पूर्ण करण्यासाठी सदर अहवाल संचिकेत जोडल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे विंधन विहीर घेण्याचे काम भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांनी सुचविलेल्याच जागेवर नेमकेपणाने केले आहे किंवा नाही याची लेखापरीक्षणस पडताळणी करता आली नाही.

4) मोजमाप पुस्तिकेवर अभियंत्याची दिनांकित स्वाक्षरी नाही.

5) विभागाने नमुना नंबर 23 उपलब्ध करून न दिल्यामुळे हेच काम पूर्वी घेतले होते किंवा नाही,घेतले असल्यास कधी पूर्ण केले होते, त्याच्यात कधी दुरूस्ती केली होती का, पूर्वी घेतले असल्यास आता पुन्हा घेण्याची गरज का होती या बाबींची पडताळणी करता आली नाही.

6) संबंधित ग्रामपंचायतीच्या स्थावर मालमत्ता नोंदवहीत या कामाची दिनांकित नोंद घेतल्याचे अभिलेखे पाहावयास मिळाले नाहीत.

7) सर्वच्या सर्व 31 कामांच्या ठिकाणी प्रत्येकी 1.143 क्युबिक मिटर 1:2:4 कॉंक्रिट वापरुन ओटे तयार केले असल्याचे मोजमाप पुस्तिकेवरून दिसून येते. 1 : 2 : 4 कॉंक्रिटचा factor हा 1.43 इतका आहे. म्हणजे 1 क्युबिक मिटर कॉंक्रिट काम करावयाचे असल्यास (वाळू + खडी) हे मिश्रण 1.43 क्युबिक मिटर इतके वापरावे लागते. एका क्युबिक मिटर साठी royalty चा दर रुपये 70.68/- इतका आहे. परंतु विभागाने ही रॉयल्टी कपात केलेली नाही.त्यामुळे विभागाने प्रत्येक कंत्राटदाराकडून ( 1.143 x 1.43 x 70.68 = 115.52 ) = 116 रुपये म्हणजे एकूण 31 कंत्राटदाराकडून (31 x 116) = 3596 रुपये वसूल करून शासन खाती जमा करणे आवश्यक आहे

**3.519 कंत्राटी अभियंत्यांना मानधन व भत्ते प्रदानातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील कंत्राटी अभियंत्यांना सन 2014-15 या आर्थिक वर्षात रुपये 11,24,544/- मानधन प्रदान केले आहे. तसेच, या कंत्राटी अभियंत्यांच्या प्रवास भत्त्यावर एकूण रुपये 4,25,929/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने सदर संवर्गातील 12 पदांच्या कंत्राटी भरतीसाठी दिनांक 09/01/2014 रोजी जाहिरात देऊन दिनांक 22/02/2014 रोजी लेखी परीक्षा घेतल्याचे संचिकेचे अवलोकन केले असता दिसून आले. निकालाअंती केवळ 5 उमेदवार 60 टक्के पेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झाल्याचे दिसून आले. परंतु विभागाने उपरोक्त 5 उमेदवारांबरोबरच 50 ते 60 टक्के च्या दरम्यान गुण मिळवणाऱ्या इतर 4 उमेदवारांना आदेश क्रमांक 2344, दिनांक 24/02/2014 अन्वये नियुक्ती दिली.

याच दिवशी म्हणजे दिनांक 24/02/2014 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी पत्र क्रमांक 2342 अन्वये सदर प्रकरणी 60 टक्के गुणांची अट शिथिल करून देण्याची शासनास विनंती केली. या प्रस्तावावर विचार करण्यासाठी शासनाने पत्र दिनांक 20/03/2014 अन्वये जिल्हा परिषदेला त्यांचा योजनानिहाय वार्षिक कृती आराखडा व कनिष्ठ अभियंता पदाच्या रिक्त जागांचा अहवाल मागविला. तो जिल्हा परिषदेने शासनास पत्र क्रमांक 105, दिनांक 07/05/2014 अन्वये सादर केला. जिल्हा परिषदने सादर केलेल्या प्रस्तावाची छाननी करून शासनाने आपले पत्र दिनांक 14/07/2014 अन्वये 60 टक्के गुणांची पात्रतेची अट शिथिल करण्यास नकार देऊन जिल्हा परिषदेच्या योजनानिहाय वार्षिक कृती आराखड्यानुसार 7 च पदांची गरज असल्याचे सूचित केले.

अशा प्रकारे, शासनाचे कुठलेही मार्गदर्शन न मागविता विभागाने 12 पदांसाठी जाहिरातच कशी दिली याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

2) नियमबाह्य रीतीने नेमणूक करण्यात आलेले 2 कनिष्ठ अभियंता श्री.पारवे व श्री.मोहरीर यांच्या मानधन व भत्त्यांपोटी एकत्रितपणे झालेला खर्च रुपये 1,63,493/- वरील तक्त्यांमध्ये दर्शविल्याप्रमाणे संबंधितांकडून वसूल करून योग्य त्या लेखाशीर्षकाखाली शासनखाती जमा करणे आवश्यक आहे.

3) कंत्राटी अभियंत्यांच्या सेवा या व्यावसायिक सेवा या प्रकारात मोडत असल्यामुळे भारतीय आयकर कायदा 1961 च्या कलम 194 (J) नुसार त्यांना देण्यात येणाऱ्या कुठल्याही मानधन वा भत्त्यावर 10 टक्के प्रमाणे आयकर कपात करणे आवश्यक आहे. परंतु विभागाने 2014-15 या वर्षात त्यांना दिलेल्या कोणत्याही मानधन अथवा भत्त्यावर आयकर कपात केलेला नाही.सर्व 7 कनिष्ठ अभियंत्यांच्या मानधन व प्रवास भत्त्यावर प्रस्तुत वर्षात विभागाने एकत्रितपणे रुपये 15,50,473/- इतका खर्च केला आहे. त्यापैकी उपरोक्त उप परिच्छेद क्रमांक 2 मध्ये दर्शविलेली रक्कम रुपये 1,63,493/- तर पूर्णच वसूलपात्र आहे व उर्वरित रक्कम रुपये 13,86,980/- च्या 10 टक्के रक्कम रुपये 1,38,698/- वरील तक्त्यांमध्ये दर्शविल्याप्रमाणे संबंधितांकडून वसूल करून योग्य त्या लेखाशीर्षकाखाली शासनखाती जमा करणे आवश्यक आहे

4) अर्धसमासपत्र क्रमांक 17, दिनांक 12/08/2016 अन्वये लेखी व वारंवार तोंडी मागणी करूनदेखील विभागाने उपरोक्त कनिष्ठ अभियंत्यांच्या प्रवास दैनंदिनी लेखापरीक्षणास उपलब्ध करून न दिल्यामुळे त्यांच्या प्रवास देयकांची तपासणी करता आली नाही.

## 3.520 राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम मौ.कुरुंदा, तालुका वसमत नळपाणी पुरवठा योजना कामातील निष्फळ व संशयास्पद खर्चाबाबत.

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद हिंगोलीने सन 2014-2015 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम मौ.कुरुंदा, तालुका वसमत नळपाणी पुरवठा योजना करीता रुपये 43,53,750/- खर्च नोंदविला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामपंचायत कुरुंदा यांनी 20 गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना पुरजळ तालुका औंढा मधुन विभक्त होऊन कुरुंदा तालुका वसमत गावासाठी स्वतंत्र योजना मंजुर करून घेतली. योजना मंजुर करून घेताना व योजनेची प्रशासकीय व अंदाज पत्रकीय किंमत काढतांना अगोदर केलेली कामे व कामाची किंमत कमी करणे आवश्यक होते परंतु परिच्छेदातील तपशिलाप्रमाणे पुन्हा तीच कामे घेवुन खर्च रुपये 3,12,788/- नोंदविला आहे जो वित्तीय औचित्याशी विसंगत असल्यामुळे लेखापरीक्षणात मान्य करण्यात येत नाही.

2) प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना 20 गावांमधुन विभक्त होउन स्वतंत्र पाणी पुरवठा योजना मंजुर करतांना अट क्रमांक 3 प्रमाणे 10 टक्के लोकवर्गणी पुर्ण भरल्यानंतरच काम सुरु करण्यात यावे. असे असतांना देखील अटीचे पालन केले नाही. तसेच लोकवर्गणी रक्कम रुपये 2,19,400/- अदयाप समितीने बँक खाती जमा केले नाही.

3) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रा.पा.धो.-1109/प्र.क्र.104(अ)/पा.पु.07, दिनांक 17/03/2010 मधील परिच्छेद क्रमांक 7.2 प्रमाणे प्रादेशिक योजनेमध्ये असलेलया गावात स्वतंत्र योजना मान्य केली जाणार नाही. परंतु कुरुंदा गावची कामे प्रगतीपथावर असतांना गाव विभक्त करुन घेण्यात आले. गावाला स्वतंत्र योजना मंजुर झाल्यावर प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेत असतांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेली वितरण व्यवस्थेची कामे पुन्हा करण्यात आली. वरील शासन निर्णय दिनांक 17/03/2010 मधील परिच्छेद 11 नुसार एकाच वेळी पहिल्या अग्रीम अनुदानानंतर व्दितीय व तृतिय अग्रीम एकाच वेळी प्राप्त करुन घेणे नियमबाहय असल्यानंतरही अशी कार्यवाही करण्यात आली. वितरण व्यवस्थेच्या कामावर / योजनेवर रुपये 43, 53, 750/- चा खर्च होउनही संचिका टिपणी परिच्छेद क्रमांक 69 नुसार पाणीपुरवठा बंद आहे. त्यामुळे झालेला खर्च निष्फळ आहे.

4) योजनेच्या पाईपलाईन वितरण व्यवस्थेमध्ये विनियोजना विनापडुन असलेला 12 Rmt Pvc पाईप लाईन किंमत रुपये 4,896/- ची वसुली करण्यात आली नाही.

5) ग्रामीण पाणी पुरवठा समिती व कंत्राटदार यांनी परिच्छेदात दर्शविलेल्या प्रमाणे योजनेच्या मुळ अंदाज पत्रकात तरतुद नसलेल्या बाबीवर कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा यांची पुर्व परवानगी किंवा मंजुरी न घेता कामे केली आहेत. सदर बाब महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता चे नियम 118 व 120 चे उल्लंघन करणारी असुन त्यामुळे रुपये 3,39,903/- व रुपये 2,10,208/- हा खर्च लेखापरीक्षणात अमान्य करण्यात येतो.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक परास-1001/प्र.क्र.16/38, दिनांक 31/01/2001 व महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, परिपत्रक क्रमांक परास-3404/प्र.क्र.126/पा.पु./13, दिनांक 02/08/2008 अन्वये कामाची प्रगती, सनियंत्रण आणि विहीत मुदतीत काम करण्याबाबत कार्यवाही करण्यात आली नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 168 प्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के तपासणी केली नाही.

8) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रा.पा.धो-1109/प्र.क्र.104 (अ)/पा.पु.07, दिनांक 01/08/2009 मधील परिच्छेद क्रमांक 2.1 व परिच्छेद क्रमांक 2.3 प्रमाणे 5 कोटी पर्यंतच्या योजनेस जिल्हा परिषदेच्या जलव्यवस्थापन समितीची प्रशासकीय मंजुरी नाही.

9) पाणी क्षमता चाचणी अहवाल नाही.

10) पाणी उपसा मोटारचे इंधन नोंदवही उपलब्ध नाही.

11) महाराष्ट्र शासन राजपत्र क्रमांक 22 दिनांक 04/04/2012 नुसार 5 टक्के मुल्यवर्धीत कराची रक्कम रुपये 2,17,338/- वसुल केली नाही.

12) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 क प्रमाणे आयकर रक्कम रुपये 97,367/- वसुल केली नाही.

13) महाराष्ट्र शासन, उदयोग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बी.सी.ए/2009/प्र.क्र.108 कामगार 7अ, दिनांक 17/06/2010 प्रमाणे 1 टक्का कामगार उपकर रुपये 49,990/- रक्कम वसुल केले नाही.

14) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास-1098/प्र.क्र.28, दिनांक 19/08/1998 अन्वये 1 टक्का कामगार विमा उतरविणे आवश्यक असुन रक्कम रुपये 49,990/- वसुल केली नाही.

### 3.521 राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम मौ. धोत्रा (उमरखोजा) तालुका हिंगोली नळपाणी पुरवठा योजना कामातील उणिवाबाबत.

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद हिंगोलीने सन 2014-2015 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम मौ.धोत्रा (उमरखोजा) तालुका हिंगोली नळपाणी पुरवठा योजना या कामासाठी रुपये 16,78,304/- खर्च नोंदविला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक परास-1001/प्र.क्र.16/38, दिनांक 31/01/2001 व महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, परिपत्रक क्रमांक परास-3404/प्र.क्र.126/पा.पु./13,दिनांक 02/08/2008 अन्वये कामाची प्रगती सनियंत्रणात आणि विहीत मुदतीत काम करण्याबाबत कार्यवाही करण्यात आली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 118,120 नुसार कार्यवाही न करता परिच्छेदात दर्शविलेल्या बाबीच्या कामावर रुपये 77,282/- जादा प्रदान झाले.

3) कामाच्या मुल्यांकनापेक्षा जादा झालेले प्रदानाची वसुली टाळण्यासाठी परिच्छेदात दर्शविल्याप्रमाणे वारंवार मुल्यांकन बदलुन कार्यान्वीत अंदाजपत्रक तयार केले आहे.

4) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ववेका-1099/सी.आर./537/(क) पा.पु.10, दिनांक 10/06/1999 अन्वये सुधारीत प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देणे टाळण्यासाठी योजना विहीत वेळेत पुर्ण करण्याची कार्यवाही झाली नाही.

5) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2009/प्र.क्र.5142/ वित्त -9, दिनांक 20/11/2009 प्रमाणे पहिल्या 10 लाखास रुपये 100 व त्यापुढील रकमेस प्रत्येक एक लक्ष किंवा त्याच्या भागासाठी रुपये 100 चे मुद्रांक शुल्क आवश्यक असल्याने रुपये 100 वसुलपात्र आहे.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 168 प्रमाणे कार्यकारी अभियंता यांची 5 टक्के तपासणी नाही.

7) मोजमाप पुस्तिकेत 3 सबमर्सिबल पंपसेट बसविण्याची नोंद आहे. परंतु पंपसेट खरेदीचे बील संचिकेत नाही. त्यामुळे पंपसेट निकृष्ट दर्जाच्या खरेदी केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 138 व पाणी पुरवठा व स्वछता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रा.पा.धो-1109/प्र.क्र.104/पा.पु.07, दिनांक 01/08/2009 मधील परिच्छेद क्रमांक 8.1 प्रमाणे समितीने आवश्यक ती प्रसिध्दी देवुन निविदा मागविली नाही.

9) मोजमाप पुस्तिका क्रमांक 1976 सक्षम अधिकारी यांच्याकडुन प्रमाणित नाही.

10) पाणी उपसा मोटरचे इंधन नोंदवही उपलब्ध नाही.

11) महाराष्ट्र शासन, राजपत्र क्रमांक 22, दिनांक 04/04/2012 नुसार 5 टक्के मुल्यवर्धीत कराची रुपये 76,378/- वसुली केली नाही.

12) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 क प्रमाणे आयकर रक्कम रुपये 34,217/- वसुल केली नाही.

13) महाराष्ट्र शासन, उदयोग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बी.सी.ए/2009/प्र.क्र.108 कामगार 7अ, दिनांक 17/06/2010 प्रमाणे 1 टक्का कामगार उपकर रुपये 16, 651/- रक्कम वसुल केले नाही.

14) समितीकडून 10 टक्के लोकवाटयातील कमी जमा रक्कम रुपये 3,250/- वसुल केली नाही.

15) परिच्छेदात नमुद तपासणी अहवाल समितीने सादर केलेले नसतांनाही अंतिम देयके प्रदान केले.

16) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास-1098/प्र.क्र.28, दिनांक 19/08/1998 अन्वये 1 टक्का कामगार विमा उतरविणे आवश्यक असुन रक्कम रुपये 16,651/- वसुल केली नाही.

17) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2008/प्र.क्र.152/यंत्रकक्ष बा.स., दिनांक 18/11/2009 नुसार साहित्य वापरण्यापुर्वी चाचणी अहवाल घेतला नाही.

**3.522 राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम मौ.हिवरा जाटु, तालुका औंढा (ना) नळपाणी पुरवठा योजना कामातील अनियमीतताबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद हिंगोलीने सन 2014-2015 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम मौ.हिवरा जाटु तालुका औंढा (ना) नळपाणी पुरवठा योजना या कामासाठी रुपये 26,75,037/- खर्च नोंदविला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक परास-1001/प्र.क्र.16/38, दिनांक 31/01/2001 व महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वछता विभाग, परिपत्रक क्रमांक परास-3404/प्र.क्र.126/पा.पु./13, दिनांक 02/08/2008 अन्वये कामाची प्रगती सनियंत्रणात आणि विहीत मुदतीत काम करण्याबाबत कार्यवाही करण्यात आली नसल्याने योजनेवर रुपये 2,55,252/- जादा खर्च झाला.

2) योजनेच्या विहिरीला मुबलक पाणी असतांना बोअर घेणे आणि अनुषंगिक केलेल्या खर्चाबाबत मुळ अंदाजपत्रकात तरतुद नसतांना झालेला खर्च रुपये 78,970/- वसुलपात्र आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 118,120 नुसार कार्यवाही न करता परिच्छेदात दर्शविलेल्या बाबीच्या कामावर रुपये 1,51,546/- जादा प्रदान झाले.

4) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ववेका-1099/सी.आर./537/(क) पा.पु.10, दिनांक 10/06/1999 अन्वये सुधारीत प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देणे टाळण्यासाठी योजना विहीत वेळेत पुर्ण करण्याची कार्यवाही झाली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 168 नुसार कार्यकारी अभियंता यांनी रुपये 50,000/- च्या प्रत्येक टप्यामध्ये कामाची 5 टक्के तपासणी केली नाही.

6) मोजमाप पुस्तिकेत 3 सबमर्शिएबल पंपसेट बसविण्याची नोंद आहे. परंतु पंपसेट खरेदीचे बील संचिकेत नाही. त्यामुळे पंपसेट निकृष्ट दर्जाच्या खरेदी केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

7) विभागाने कामाच्या एकुण मुल्यांकनामधून लोक वर्गणी, प्राकलने, आराखडा व पर्यवेक्षण फी अंतिम देयकापूर्वी दिलेली अग्रिमे वजा करुन अंतिम बिल देणे आवश्यक असतांना उपरोक्त रक्कमा वजा न करता अंतिम देयक प्रदान केल्यामुळे समितीस रूपये 2,55,252/- जादा प्रदान झाले.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 138 व पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रा.पा.धो-1109/प्र.क्र.104/पा.पु.-07, दिनांक 01/08/2009 मधील परिच्छेद क्रमांक 8.1 प्रमाणे समितीने आवश्यक ती प्रसिध्दी देवुन निविदा मागविली नाही.

9) पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव पडताळणी प्रमाणपत्रावर मुख्य कार्यकारी अधिकारी व कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी नाही. पाणी क्षमता चाचणी अहवाल भुजल सर्वेक्षण अधिका-याचा नसून उपविभागीय अभियंता, उपविभाग औंढा (ना) यांचा आहे. योजना काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्रामध्ये काम पूर्ण दिनांकात खाडाखोड केलेला आहे. योजनेच्या कामासाठी वापरण्यात आलेली मोजमाप पुस्तिका क्र. 1867 सक्षम अधिकारी यांचेकडून प्रमाणित नाही.पाणी उपसा मोटारचे इंधन नोंदवही उपलब्ध नाही.

10) महाराष्ट्र शासन, राजपत्र क्रमांक 22, दिनांक 04/04/2012 नुसार 5 टक्के मुल्यवर्धीत कराची रुपये 80,622/- वसुली केली नाही. आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 क प्रमाणे आयकर रक्कम रुपये 58,732/- वसुल केली नाही. महाराष्ट्र शासन, उदयोग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बी.सी.ए/2009/प्र.क्र.108 कामगार 7अ, दिनांक 17/06/2010 प्रमाणे 1 टक्का कामगार उपकर रुपये 3,647/- रक्कम वसुल केले नाही.

11) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास-1098/प्र.क्र.28 दिनांक 19/08/1998 अन्वये 1 टक्का कामगार विमा उतरविणे आवश्यक असुन रक्कम रुपये 3,647/- वसुल केली नाही.

12) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2008/प्र.क्र.152/यंत्रकक्ष बा.स., दिनांक 18/11/2009 नुसार साहित्य वापरण्यापुर्वी चाचणी अहवाल घेतला नाही.

**3.523 राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम मौ. कानोसा तालुका वसमत नळपाणी पुरवठा योजना कामातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद हिंगोलीने सन 2014-2015 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम मौ.कानोसा तालुका वसमत नळपाणी पुरवठा योजना या कामासाठी रुपये 23,41,925/- खर्च नोंदविला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक परास-1001/प्र.क्र.16/38, दिनांक 31/01/2001 व महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, परिपत्रक क्रमांक परास-3404/प्र.क्र.126/ पा.पु./13,दिनांक 02/08/2008 अन्वये कामाची प्रगती, सनियंत्रण आणि विहीत मुदतीत काम करण्याबाबत कार्यवाही करण्यात आली नाही.

2) जलकुंभ बांधकाम बाब क्रमांक 3 यावरील जादा प्रदानाची रक्कम रूपये 9,246/- समितीकडुन वसुल केली नाही.

3) योजनेच्या कामात दिरंगाई केल्यामुळे व प्राप्त अनुदानापेक्षा कामाचे मुल्यांकन कमी होत असल्यामुळे योजनेच्या सुरुवातीची कामे विहिर खोदकाम व बांधकाम सारख्या कामास नवीन कार्यान्वीत जादा दराचे अंदाजपत्रक तयार करुन जुन्या कामांना जादा दर देवून समितीस जादा प्रदान केलेली रक्कम रुपये 1,01,591/- समितीकडून वसूल करुन शासन खाती जमा करण्यात यावी.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 118,120 नुसार कार्यवाही न करता कामावर रुपये 4,724/- जादा प्रदान झाले.

5) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वछता विभाग, शासन निर्णय क्रमांक ववेका-1099/सी.आर./537/(क) पा.पु.10, दिनांक 10/06/1999 अन्वये सुधारीत प्रशासकीय व तांत्रीक मान्यता देणे टाळण्यासाठी योजना विहीत वेळेत पुर्ण करण्याची कार्यवाही झाली नाही.

6) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2009/प्र.क्र.5142/वित्त -9,दिनांक 20/11/2009 प्रमाणे पहिल्या 10 लाखास रुपये 100 व त्यापुढील रक्कमेस प्रत्येक एक लक्ष किंवा त्याच्या भागासाठी रुपये 100 चे मुद्रांक शुल्क आवश्यक असल्याने रुपये 1,600/- वसुलपात्र आहे.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 168 नुसार कार्यकारी अभियंता यांनी कामाची 5 टक्के तपासणी केली नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 138 व पाणी पुरवठा व स्वछता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रा.पा.धो-1109/प्र.क्र.104/पा.पु.-07, दिनांक 01/08/2009 मधील परिच्छेद क्रमांक 8.1 प्रमाणे समितीने आवश्यक ती प्रसिध्दी देवुन निविदा मागविली नाही.

9) मोजमाप पुस्तिका क्रमांक 1529 सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणित केली नाही. इंधन नोंदवही उपलब्ध केली नाही.

10) महाराष्ट्र शासन, राजपत्र क्रमांक 22, दिनांक 04/04/2012 नुसार 5 टक्के मुल्यवर्धित कराची रुपये 1,14,744/- वसुली केली नाही. आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 क प्रमाणे आयकर रक्कम रुपये 51,405/- वसुल केली नाही. महाराष्ट्र शासन, उदयोग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बी.सी.ए/2009/प्र.क्र.108/कामगार 7अ, दिनांक 17/06/2010 प्रमाणे 1 टक्का कामगार उपकर रुपये 25,595/- रक्कम वसुल केले नाही.

11) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास-1098/प्र.क्र.28 दिनांक 19/08/1998 अन्वये 1 टक्का कामगार विमा उतरविणे आवश्यक असुन रक्कम रुपये 25,595/- वसुल केली नाही.

12) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2008/प्र.क्र.152/यंत्रकक्ष बा.स., दिनांक 18/11/2009 नुसार साहित्य वापरण्यापुर्वी चाचणी अहवाल घेतला नाही.

13) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-1109/प्र.क्र.104 (अ)/ पापु-7, दिनांक 17 मार्च 2010 मधील परि.क्रमांक 11 नुसार लोकवर्गणी जमा केले नंतर शासन निधीचा पहिला हप्ता 30 टक्के, दुसरा हप्ता 30 टक्के, तिसरा हप्ता 30 टक्के या प्रमाणे वितरीत करावयाचा आहे. उर्वरित 10टक्के निधी पुढील एक वर्षे योजना यशस्वी रित्या चालवल्यानंतर अदा करावयाचा आहे. योजना एक वर्षे यशस्वी रित्या चालवल्या बाबतची कागदपत्रे संचीकेत नाहीत. त्यामुळे 10 टक्के शासन निधी प्रदाना बाबत पडताळणी करता आली नाही.

**3.524 राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम मौ.पळसी तालुका सेनगांव नळपाणी पुरवठा योजना कामातील उणीवा बाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद हिंगोलीने सन 2014-2015 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम मौ.पळसी तालुका सेनगांव नळपाणी पुरवठा योजना या कामासाठी रुपये 36,92,562/- खर्च नोंदविला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रा.पा.धो-1109/प्र.क्र.104 (अ)/पा.पु.07, दिनांक 01/08/2009 मधील परिच्छेद क्रमांक 2.1 प्रमाणे स्वतंत्र नळपाणी पुरवठा योजना घेतांना ग्रामसभेची ठरावान्वये प्रशासकीय मंजुरी घेतलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक परास-1001/प्र. क्र.16/38, दिनांक 31/01/2001 व महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वछता विभाग, परिपत्रक क्रमांक परास-3404/प्र.क्र.126/पा.पु./13, दिनांक 02/08/2008 अन्वये कामाची प्रगती सनियंत्रणात आणि विहीत मुदतीत काम करण्याबाबत कार्यवाही करण्यात आली नसल्याने योजनेवर रुपये 6,06,509/- जादा खर्च झाला आहे.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2009/प्र.क्र.514/ वित्त -9, दिनांक 20/11/2009 प्रमाणे पहिल्या 10 लाखास रुपये 100 व त्यापुढील रक्कमेस प्रत्येक एक लक्ष किंवा त्याच्या भागासाठी रुपये 100 चे मुद्रांक शुल्क आवश्यक असल्याने रुपये 2,500/- वसुलपात्र आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 168 नुसार कार्यकारी अभियंता यांनी कामाची 5 टक्के तपासणी केली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 138 व पाणी पुरवठा व स्वछता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रा.पा.धे-1109/प्र.क्र.104/पा.पु.07, दिनांक 01/08/2009 मधील परिच्छेद क्रमांक 8.1 प्रमाणे समितीने आवश्यक ती प्रसिध्दी देवुन निविदा मागविली नाही.

8) योजनेच्या कामासाठी वापरण्यात आलेली मोजमाप पुस्तिका क्रंमांक 559 सक्षम अधिकारी यांचेकडून प्रमाणित नाही. पाणी उपसा मोटारचे इंधन नोंदवही उपलब्ध नाही.

9) मुल्यवर्धीत कराची कमी कपात केलेली रक्कम रुपये 1,52,570/- आयकर रुपये 74,838/- कमी कपात केलेली कामगार उपकराची रक्कम रुपये 29,179/- वसुल करुन भरणा करण्यात यावी. तसेच मुल्यवर्धीत कर, कामगार उपकर व कामगार विमा यांची चलाने सादर करण्यात यावी.

10) अर्धसमासपत्र क्रमांक 5 दिनांक 21/06/2016 अन्वये सदर कामाचे मुळ अंदाजपत्रक मागणी करूनही उपलब्ध केले नाही. सदरील कामाचे तक्रारी बाबत चौकशी व पुढील कार्यवाही यांचे अभिलेखे दर्शविण्यात आले नाही.

11) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 118, 120 नुसार कार्यवाही न करता परिच्छेदात दर्शविलेल्या बाबीच्या कामावर रुपये 25,811/- जादा प्रदान झाले.

12) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास-1098/प्र.क्र.28, दिनांक 19/08/1998 अन्वये 1 टक्का कामगार विमा उतरविणे आवश्यक असुन रक्कम रुपये 29,178/- वसुल केली नाही.

13) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2008/प्र.क्र.152/यंत्रकक्ष बा.स., दिनांक 18/11/2009 नुसार साहित्य वापरण्यापुर्वी चाचणी अहवाल घेतला नाही.

14) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-1109/प्र.क्र.104 (अ)/ पापु-7, दिनांक 17 मार्च 2010 मधील परि.क्रमांक 11 नुसार लोकवर्गणी जमा केले नंतर शासन निधीचा पहिला हप्ता 30टक्के, दुसरा हप्ता 30 टक्के, तिसरा हप्ता 30 टक्के या प्रमाणे वितरीत करावयाचा आहे. उर्वरित 10 टक्के निधी पुढील एक वर्षे योजना यशस्वी रित्या चालवल्यानंतर अदा करावयाचा आहे. योजना एक वर्षे यशस्वी रित्या चालवल्या बाबतची कागदपत्रे संचीकेत नाहीत. त्यामुळे 10 टक्के शासन निधी प्रदाना बाबत पडताळणी करता आली नाही.

### 3.525 राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम मौ. सुलदरी (खु), सावरखेडा तालुका सेनगांव कामातील अनियमीतताबाबत.

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद हिंगोलीने सन 2014-2015 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम मौ.सुलदरी (खु) सावरखेडा, तालुका सेनगांव खर्च रुपये 10,43,623/- नोंदविला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक परास-1001/प्र.क्र.16/38, दिनांक 31/01/2001 व महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वछता विभाग, परिपत्रक क्रमांक परास-3404/प्र.क्र.126/पा.पु./13, दिनांक 02/08/2008 अन्वये कामाची प्रगती, सनियंत्रण आणि विहीत मुदतीत काम करण्याबाबत कार्यवाही करण्यात आली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 118, 120 नुसार कार्यवाही न करता परिच्छेदात दर्शविलेल्या बाबीच्या कामावर रुपये 84,000/- जादा प्रदान झाले.

3) करारनाम्यातील व कामाच्या आदेशातील नियम व अटी प्रमाणे अट क्रमांक 5 शासनाच्या नियमाप्रमाणे सर्व कराच्या कपाती करणे आवश्यक असतांना कोणतीही कराची कपात केलेली नाही.

4) कामाचे आदेश, करारनामातील अट तसेच पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रा.पा.धों.1109/प्र.क्र.104(अ)पा.पू.07, दिनांक 17/03/2010 मधील परिच्छेद क्रमांक 11 प्रमाणे जिल्हा परिषदेने देयकातून 10 टक्के निधी राखून ठेवला नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 168 नुसार कार्यकारी अभियंता यांनी कामाची 5 टक्के तपासणी केली नाही.

6) संचिकेत सबमर्शिबल पंप सेट खरेदीचे बिल नाही. त्यामुळे पंपसेट निकृष्ट दर्जाचा खरेदी केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

7) योजनेच्या कामासाठी वापरण्यात आलेली मोजमाप पुस्तिका क्रमांक 7659 सक्षम अधिकारी यांचेकडून प्रमाणित नाही. क्षमता चाचणी अहवाल घेण्यात आला नाही.

8) महाराष्ट्र शासन, राजपत्र क्रमांक 22,दिनांक 04/04/2012 नुसार 5 टक्के मुल्यवर्धीत कराची रुपये 18,850/- वसुली केली नाही. आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 क प्रमाणे आयकर रक्कम रुपये 21,112/- वसुल केली नाही. महाराष्ट्र शासन, उदयोग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बी.सी.ए/2009/प्र.क्र.108 कामगार 7अ, दिनांक 17/06/2010 प्रमाणे 1 टक्का कामगार उपकर रुपये 10,654/- रक्कम वसुल केले नाही.

9) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास-1098/प्र.क्र.28, दिनांक 19/08/1998 अन्वये 1 टक्का कामगार विमा उतरविणे आवश्यक असुन रक्कम रुपये 10,654/- वसुल केली नाही.

10) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2008/प्र.क्र.152/यंत्रकक्ष बा.स., दिनांक 18/11/2009 नुसार साहित्य वापरण्यापुर्वी चाचणी अहवाल घेतला नाही.

11) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-1109/प्र.क्र.104 (अ)/ पापु-7, दिनांक 17/03/2010 मधील परि.क्रमांक 11 नुसार लोकवर्गणी जमा केले नंतर शासन निधीचा पहिला हप्ता 30 टक्के, दुसरा हप्ता 30 टक्के, तिसरा हप्ता 30 टक्के या प्रमाणे वितरीत करावयाचा आहे. उर्वरित 10 टक्के निधी पुढील एक वर्षे योजना यशस्वी रित्या चालवल्यानंतर अदा करावयाचा आहे. योजना एक वर्षे यशस्वीरित्या चालवल्या बाबतची कागदपत्रे संचीकेत नाहीत. त्यामुळे 10 टक्के शासन निधी प्रदाना बाबत पडताळणी करता आली नाही.

**3.526 नळ पाणी पुरवठा योजना मौ.अब्दुलापूर तालुका उमरी कामातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2014-2015 (परीच्छेद क्रमांक 2) -** सन 2014-2015 या कालावधीचे ग्रामीण पाणीपूरवठा विभाग, जिल्हा परिषद नांदेडचे लेखापरिक्षणात रूपये 13,17,960/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक 11 पापु-1005/प्र.क्र.74(2)/पापु-07,दिनांक 02/05/2005 व शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक जस्वप्र-2007/वित्तीय सल्लागार प्र.क्र.1/पापु 11,दिनांक 06/12/2007 अन्वये कामाच्या विशिष्ट टप्प्यावर गावात जावून तपासणी करणे, कामे सूरू असतांना वेळोवेळी अचानक भेटी देवून पाहणी करणे, तांत्रिक सल्लागाराशी चर्चा करणे, गैरव्यवहाराबाबत ग्राम

सामाजिक लेखापरीक्षण समितीला त्वरीत कार्यवाही करावयाच्या सूचना देणे आवश्यक असतांना विभागाकडून याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे आढळून आले नाही.

2) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक BCA-2009/प्र.क्र.108/काम-7-अ, दिनांक 21/07/2011 अन्वये तसेच उपकर अधिनियमाच्या कलम 3 व नियम 4 (3) नुसार कामाच्या देयकातून 1 टक्के कामगार उपकराची रक्कम कपात करून ती रक्कम तात्काळ जमा करावयाची आहे. परंतु समितीने या कामाच्या देयकातून रक्कम रुपये 44,967/- कपात केलेली नाही. त्यामुळे कंत्राटदाराना जादा प्रदान झालेले असून शासनाचे नुकसान झालेले आहे. तरी रक्कम तात्काळ कामगार कल्याण मंडळा कडे भरणा करणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास-1098/प्र.क्र.28,दिनांक 19/08/1998 अन्वये कंत्राटी कामाच्या 1 टक्के दराने कामाचा विमा उतरविणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही झालेली नाही.

4) मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे अनुच्छेद 73 नुसार नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांचे पत्र क्रमांक 12/कलम-432/मसूस-133-09,दिनांक 20/07/2009 अन्वये सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रूपये 44,96,700/-साठी मुद्रांक शुल्क रक्कम रूपये 3,600/- च्या दस्तऐवजावर करारनामा करणे आवश्यक असताना रूपये 1,000/- च्या मुद्रांकावर करण्यात आला आहे. सबब फरकाची रक्कम रूपये 2,600/- कंत्राटदाराकडून वसूल करून शासनाच्या विहित लेखाशीर्ष अंतर्गत भरणा करण्यात यावी.

5) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनी-10/1009/प्र.क्र.309/ख(३),दिनांक 11/02/2010 अन्वये कामावर वापरण्यात आलेल्या रेती, गिट्टी,मेटल व दगड या साहित्यातून स्वामित्व धनाची रुक्कम वसूल करून शासन खाती भरणा करणे आवशक आहे. तथापि, स्वामित्व धनाची रुक्कम शासन खाती भरणा केलेल्या पावत्या व अशा पावत्या पडताळणी केलेबाबत उपविभागीय अधिकारी कार्यालय /तहसील कार्यालयाचे पडताळणी प्रमाणपत्र संचिकेत दिसून आले नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 174 (अ) प्रमाणे कामाच्या मोजमापाच्या नोंदी मोजमाप पुस्तिका नमुना क्रमांक 155 मध्ये घेणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त कामाच्या मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास दर्शविली नाही. त्यामुळे मुल्यांकनाची खात्री होऊ शकली नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 100 अन्वये प्रस्तूत कामाची नोंद नमुना नंबर 42 च्या प्रकल्प नोंदवहीमध्ये ठेवणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

**3.527 नळ पाणी पुरवठा योजना मौ.कुंटूर तालुका नायगाव कामातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2014-2015 (परीच्छेद क्रमांक 11) -** सन 2014-2015 या कालावधीचे ग्रामीण पाणीपूरवठा विभाग, जिल्हा परिषद नांदेडचे लेखापरिक्षणात रूपये 58,63,860/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक ग्रापापु-1007/प्र.क्र.243/पापु-07,दिनांक 04/02/2008 अन्वये मुळ मंजुर किमतीच्या 15 टक्के पेक्षा जास्त रक्कमेचे अंदाजपत्रक शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावेत. सदर कामासाठी मे. प्रतिभा कन्सट्रक्शन निविदा स्वीकृत केली आहे. जादा दरासाठी शासन मंजुरीसाठी प्रस्ताव/पत्रव्यवहार केला आहे. परंतु शासन मान्यता प्राप्त झाल्याचे अभिलेखे संचिकेत आढळुन आले नाहीत.

2) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक BCA-2009/प्र.क्र.108/काम-7-अ,दिनांक 21/07/2011 अन्वये तसेच उपकर अधिनियमाच्या कलम 3 व नियम 4 (3) नुसार कामाच्या देयकातून 1 टक्के कामगार उपकराची रक्कम कपात करून ती रक्कम तात्काळ जमा करावयाची आहे. परंतु समितीने या कामाच्या देयकातून रक्कम रुपये 1,95,462/- कपात केलेली नाही. तरी रक्कम तात्काळ कामगार कल्याण मंडळा कडे भरणा करणे आवश्यक आहे.

3) करारनामा व निविदेतील अटी व शर्ती नुसार (अट क्रमांक-25) अन्वये उद्भवाचे खोदकाम झाल्यावर पाण्याची क्षमता गुणवत्ता याची तपासणी जिल्हा प्रयोगशाळामार्फत करावी. पाण्याची क्षमता गुणवत्ता योग्य सिद्ध झाल्यावरच पुढील कामे करावीत. परंतु पाण्याचा गुणवत्ता अहवाल संचिकेत दिसून आला नाही.

4) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक आयकर 1007/प्र.क्र.105/कोषा प्र.-5,दिनांक 22/02/2008 व आयकर अधिनियम 1961 चे 194 (सी) अन्वये ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस प्रदान रक्कम रुपये 56,63,860/- वर 2 टक्के दराने रुपये 1,13,277/- आयकर वसूल करुन शासन खाती जमा दर्शवावी.

5) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग क्रमांक विमास-1098/प्र.क्र.28,दिनांक 19/08/1998 अन्वये कंत्राटी कामाच्या 1 टक्के दराने कामाचा विमा उतरविणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही झालेली नाही. तरी रक्कम रुपये 1,95,462/- वसूल करुन विमा संचालनालयाकडे भरणा करणे आवश्यक आहे.

6) मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे अनुच्छेद 73 नुसार नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांचे पत्र क्रमांक12/कलम-432/मसूस-133-09,दिनांक 20/07/2009 अन्वये सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रूपये 49,97,100/- साठी मुद्रांक शुल्क रक्कम रूपये 18,600/- च्या दस्तऐवजावर करारनामा करणे आवश्यक असताना रूपये 1000/-च्या मुद्रांकावर करण्यात आला आहे. रक्कम रूपये 17,600/- कंत्राटदाराकडून वसूल करून शासनाच्या विहित लेखाशीर्ष अंतर्गत कोषागारात भरणा करणे आवश्यक आहे.

7) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बीडीजी-2005/प्र.क्र.324/ईमारती-2,दिनांक 03/03/2006 अन्वये नोंदणीधारक कंत्राटदारांकडून 2 टक्के मूल्यवर्धित कराची रक्कम रुपये 1,13,277/- कामाच्या देयकातून कपात करून शासन खाती भरणा करणे आवशक होते. तथापि अशी कार्यवाही केलेली नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 100 अन्वये प्रस्तूत कामाची नोंद नमुना नंबर 42 च्या प्रकल्प नोंदवहीमध्ये ठेवणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

9) महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-1109/प्र.क्र.104(अ)/पापु-07,दिनांक17/03/2010 चे परिच्छेद 8.2 अन्वये स्रोतांचाविकास करण्यासाठी भूजलाधारित स्रोत निश्चित करणारे भूजल वैज्ञानिकाचे स्रोत प्रमाणपत्र संचिकेत दिसून आले नाही.

**3.528 उपविभाग नांदेड अंतर्गत केलेल्या कामातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2014-2015 (परीच्छेद क्रमांक 21) -** सन 2014-2015 या कालावधीचे ग्रामीण पाणीपूरवठा विभाग, जिल्हा परिषद नांदेडचे लेखापरिक्षणात रूपये 7,66,345/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मौजे चीमेगाव, तालूका नांदेड येथील नळ योजनेच्या विहिरीजवळ कॉपर डॅम चे काम करण्यात आले आहे. तथापि सदर कामाबाबत जागा व मालकी प्रमाणपत्र संचिकेत दिसून आले नाही. तसेच सदर कामांचे स्थळ दर्शक नकाशे संचिकेत नाहीत, location plant/साखळी याबाबतचा कोणताही उल्लेख संचिकेत करण्यात आला नाही. मोजमाप पुस्तिकेवर देखील या कामाबाबतच्या स्थळाचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 163 ते 166 व शासन परिपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग झेडपीए-2000/प्र.क्र.44/33,दिनांक 22/12/2000 अन्वये कामाच्या मोजमाप पुस्तिका तपशिलवार व प्रत्येक नोंद ही दिनांकासहित घ्यावी. या नियमांचे व शासन निर्णयाचे यथोचित पालन केल्याचे दिसून येत नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 197 प्रमाणे पाणी पुरवठा योजना पूर्ण झालेल्या कामाची नोंद नमूना नंबर 69 मध्ये ठेवणे आवश्यक आहे. परंतू विभागाने नियमानुसार कार्यवाही केलेली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 177 (4) नुसार विभागाने बांधकाम मोजमाप पुस्तिका व बांधकाम देयकातील परिमाण दर, अंकगणितीय तपासण्या करणे आवश्यक आहे. सबब उपरोक्त नमूद कामासंदर्भात अशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

**3.529 पाणीपुरवठा नळ योजना मौ. सांगवी (बेनक) तालुका मुखेड कामातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2014-2015 (परीच्छेद क्रमांक 25) -** सन 2014-2015 या कालावधीचे ग्रामीण पाणीपूरवठा विभाग, जिल्हा परिषद नांदेडचे लेखापरिक्षणात रूपये 44,64,465/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, निर्णय क्रमांक ग्रापापु-1007/प्र.क्र.243/पापु-07, दिनांक 04/02/2008 अन्वये मुळ मंजूर किमतीच्या 15 टक्के पेक्षा जास्त रक्कमेचे अंदाजपत्रक शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावेत. सदर कामासाठी मे.पांडुरंग कन्सट्रक्शन (अंदाजपत्रकिय दरापेक्षा 15 टक्के जादा दराने) निविदा स्वीकृत केली आहे. जादा दारासाठी शासनाची मंजुरी घेण्यात आलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक BCA-2009/प्र.क्र.108/काम-7-अ,दिनांक 21/07/2011 अन्वये तसेच उपकर अधिनियमाच्या कलम 3 व नियम 4(3) नुसार कामाच्या देयकातून 1 टक्के कामगार उपकराची रक्कम कपात करून ती रक्कम तात्काळ जमा करावयाची आहे. परंतु समितीने या कामाची रक्कम रुपये 1,48,815/- जमा केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक आयकर 1007/प्र.क्र.105/कोषाप्र.-5,दिनांक 22/02/2008 व आयकर अधिनियम 1961 चे 194 (सी) अन्वये ग्रामपाणीपुरवठा व स्वच्छता समितीस प्रदान रक्कम रूपये 44,64,465/- वर 2 टक्के दराने रूपये 89,289/- आयकर वसूल करुन शासनखाती जमा दर्शवावी.

4) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग क्रमांक विमास-1098/प्र.क्र.28,दिनांक 19/08/1998 अन्वये कंत्राटी कामाच्या 1 टक्के दराने कामाचा विमा उतरविणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही झालेली नाही. तरी रक्कम रूपये 1,48,815/- (रूपये 1,48,81,500/- चे 1 टक्के) वसूल करुन विमा संचालनालयाकडे भरणा करावी.

5) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांकबीडीजी-2005/प्र.क्र.324/ईमारती-2,दिनांक 03/03/2006 अन्वये नोंदणीधारक कंत्राटदारांकडून 2 टक्के मूल्यवर्धितकराची रक्कम रूपये 89,289/- कामाच्या देयकातून कपात करून शासनखाती भरणा करणे आवशक होते. तथापि अशी कार्यवाही केलेली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 100 अन्वये प्रस्तूत कामाची नोंद नमुना नंबर 42 च्या प्रकल्प नोंदवहीमध्ये ठेवणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

**3.530 हातपंप सुटेभाग खरेदी व हातपंप असेंब्ली (हातपंप संच) खरेदीतील अनियमिततााबाबत.**

**जिल्हा परीषद नांदेड, सन 2014-2015 (परीच्छेद क्रमांक 29) -** सन 2014-2015 या कालावधीचे ग्रामीण पाणीपूरवठा विभाग, जिल्हा परिषद नांदेडचे लेखापरिक्षणात रूपये 1,01,31,400/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरील साहित्यखरेदी पूर्वी यांत्रिकी विभागाने पंचायत समितीनिहाय मागणीप्राप्त करून खरेदीकरणे आवश्यक होते, तथापी यांत्रिकी विभागाने अशा प्रकारे कार्यवाही न करता खरेदी केल्याचे दिसून आले.

2) पत्र क्रमांक - 44/10,दिनांक 10/01/2014 अन्वये सदर हातपंप सुटे भाग खरेदीसाठी प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा विभाग औरंगाबाद यांचेकडे तांत्रिक मंजुरी मिळणे साठी विनंती केलेली दिसून येते, अद्यापही तांत्रिक मंजुरी प्राप्त झालेली नाही, मंजुरीविनाच खरेदी झालेली दिसून येते.

3) हातपंप संच खरेदी (प्रमाणाक क्रमांक 195 व 29) साठी पुरवठादारास आदेश देण्यापूर्वी त्यांचे कडून मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, परिशिष्ट 5 (ह)) नुसार विहित रक्कमेचा स्टँप पेपरवर करारनामा करून घेणे आवश्यक आहे. रुपये 5,600/- रक्कमेच्या स्टँप पेपरवर करारनामा करणे आवश्यकता असताना रूपये 2,000 /- च्या मुद्रांक पेपरवर करण्यात आला आहे. तेव्हा रक्कम रूपये 3,600/- वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चेनियम 91 नुसार उपकार्यकारी अभियंता (यांत्रिकी) यांनी दरसहा महिन्यानंतर साठयाची तपासणी करणे आवश्यक असतांना संबंधीत अशी तपासणी केली नसल्याचे दिसून आले.

6) हातपंप सुटेभाग आणी हातपंप असेंब्ली दुरुस्ती मध्ये नादुरुस्त सुटे भाग बदलून नवीन सुटे भाग बसविल्याने जुन्या सुट्या भागांची काय विल्हेवाट लावली, याबाबत खूलासा करावा.

**3.531 विंधन विहीर खोदकाम करणे व हातपंप बसविणे कामातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2014-2015 (परीच्छेद क्रमांक 31) -** सन 2014-2015 या कालावधीचे ग्रामीण पाणीपूरवठा विभाग, जिल्हा परिषद नांदेडचे लेखापरिक्षणात रूपये 16,86,270/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विंधन विहीर पूर्ण झाल्यावर ग्राम पंचायतीच्या ताब्यात द्यावे ग्रामपंचायतचे हस्तांतर प्रमाणपत्र व कामाचे फोटो देयकासोबत सादर करावे याशिवाय देयक पारित होणार नाही असे स्पष्ट नमुद असताना सदर ग्रामपंचायतीची देयके अदा करून कार्यकारी अभियंता यांच्या आदेशाचे उल्लंघन केल्याचे दिसून येते. तसेच ग्रामपंचायत मोटारगा च्या हातपंप व कट्टा बांधणी अहवाल व दाखल्यावर सरपंच/ ग्रामसेवक/ उपसरपंच यांची सही व शिक्का घेण्यात आला नाही, करिता संबंधित विहीर ग्रामपंचायतीने ताब्यात घेतल्याची खात्री करता आली नाही.

2) सदर ग्रामपंचायतींच्या काम पूर्णत्व प्रमाणपत्रांची तपासणी केली असता काम सुरु केल्याचा दिनांक 26/08/2014 असून काम पूर्ण केल्याचा दिनांक देखील 26/08/2014 हाच नमूद केला आहे, 12 ग्रामपंचायतीमध्ये एकाच दिवशी 12 विंधन विहीरीचे खोदकाम करून त्यावर हातपंप बसविण्याचे काम करण्यात आले आहे.

3) आंदेगाव वाडी यांनी हातपंप व कट्टा बांधणी बाबतचा दाखल्यावर दिनांक 30/07/2014 रोजी हातपंप बसविण्याचे काम व कट्टा बांधण्याचे काम युनिसेफद्वारे दिलेल्या डिजाईन प्रमाणे पूर्ण केले असल्याबाबतचा दाखला दिला आहे. तथापि कामाचे आदेश 31/07/2014 रोजी देण्यात आलेले असताना हातपंप व कट्टा बांधकामाचा दाखला त्याआधीच दिनांक 30/07/2014 रोजी दिल्याच्या विसंगतीबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 163 ते 166 व शासन परिपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग झेडपीए-2000/प्र.क्र.44/33 दिनांक 22/12/2000 अन्वये कामाच्या मोजमापपुस्तिका तपशिलवार व प्रत्येक नोंद ही दिनांकासहित घ्यावी. असे असतांना मोजमाप पुस्तिकेतील नोंदी तपशीलवार न घेता केवळ अंदाजपत्रकात नमूद असणाऱ्या बाबीच जशास तशा नमूद करण्यात आल्या आहेत.

5) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, परिपत्रक क्रमांक 11 पापु-1005/प्र.क्र.74(2)/पापु-07, दिनांक 02/05/2005 व शासन परिपत्रक पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक जस्वप्र-2007/वित्तीय सल्लागार प्र.क्र.1/पापु 11,दिनांक 06/12/2007 अन्वये कामाच्या विशिष्ट टप्प्यावर गावात जावून तपासणी करणे, कामे सूरू असतांना वेळोवेळी अचानक भेटी देवून पाहणी करणे, तांत्रिक सल्लागाराशी चर्चा करणे इत्यादी कार्यवाही करावयाच्या सूचना देणे आवश्यक असतांना विभागाकडून याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे आढळून आले नाही.

**3.532 पेयजल योजना अपुर्ण कामाबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबादने 94 नळपाणीपुरवठा योजना कामावर रुपये 941.80 लक्ष खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

एकुण 94 ग्रामीण पाणीपुरवठ्यांचे कामावर रक्कम रुपये 941.80 लक्ष खर्च केलेले असुन सदरील कामे अपूर्ण असून काही कामे प्रगतीपथावर तर काही भौतिक दृष्टया पूर्ण तर काही आर्थिक दृष्टया अपूर्ण आहेत. त्यात बरीच कामे सन 2006-2007 पासुन अपूर्ण आहेत. तरी सदरील कामे पूर्ण करणे आवश्यक आहे.

**3.533 मौजे मातोळा, तालुका उमरगा येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध कुटूंबांना वैयक्तिक स्वतंत्र नळजोडणी पाणी पुरवठा सुविधा उपलब्ध करुन देणे खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबादचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाच्या लेखापरिक्षणा मध्ये महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी पाणी

पुरवठा व स्वच्छता योजनांतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध कुटुंबाना शौचालये व वैयक्तिक नळजोडणी व तदनुषंगिक कामाच्या खर्चावर खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मोजमाप पुस्तिका क्रमांक 736 पान क्रमांक 21 वर फक्त रक्कम रुपये 2,35,132/- चे मुल्यांकन झालेले आहे. त्याबाबत झालेल्या ठिकाणी सक्षम प्राधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली नाही.

2) मोजमाप पुस्तिकेवर उर्वरित रक्कम प्रदान केल्याचा तपशिल (उदा- चेक / धनादेश क्रमांक, चेक / धनादेश दिनांक, प्रदान केल्याची दिनांक इत्यादी) नमुद करण्यात आलेला नाही. तसेच प्रमाणित केलेले नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

3) देयकातून 1 टक्के कामगार कल्याण उपकर रक्कम रुपये 4,543/- व 1 टक्के विम्याची रक्कम रुपये 4,543/- अशी एकुण रक्कम रुपये 9,086/- कपात करणेत आलेली नाही. संबंधितांना संपूर्ण रक्कम प्रदान झालेली आहे. तरी सदरील रक्कम रुपये 9,086/- वसुल करुन संबंधीत खाती जमा करणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन शुद्धीपत्रक, क्रमांक ग्रापाधो/1111/ प्र.क्रं.156/पा.पु.07,दिनांक 08/02/2012 व महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन शुद्धीपत्रक क्रमांक ग्रापाधो/1111/प्र.क्रं.156/पा.पु.07, दिनांक 18/11/2011 अन्वये निर्देशित केल्याप्रमाणे 2 टक्के प्रकल्प व्यवस्थापन शुल्क रक्कम रुपये 9,087/- शासन जमा केले किंवा कसे त्याचप्रमाणे सदरील रक्कम कपात केलेली असेल तर ती कुठे जमा केली आहे. त्याचप्रमाणे या रकमेचा कोणत्या प्रकारे विनियोग केला याबाबत अभिलेख्यावरुन पडताळणी करता आली नाही.

5) सदरील काम पूर्ण झाल्याचे अभिलेख्यावरुन दिसुन आले नाही. तथापि संबंधित ग्रामपंचायतीस संपुर्ण रक्कम प्रदान करणेत आलेली आहे.

6) निधी वितरण आदेश क्रमांक जिपऊ/ग्रापापुवि/जिपास्वमि/2956/2012, दिनांक 30/08/2012 तसेच जावक क्रमांक ग्रापापुवि/लेखा/67/2013,दिनांक 12/11/2013 मधील निर्देशानुसार दुसऱ्या हप्त्याच्या निधीची मागणी प्रस्तावित करत असताना उर्वरित सर्व लोकवर्गणी बँक खात्यात जमा करणे आवश्यक आहे. तथापि अशा प्रकारे बँक खात्यात रक्कम जमा केल्याचे अभिलेख्यावरुन निदर्शनास आले नाही.

7) तांत्रिक मंजूरी आदेश क्रमांक जिपऊ/ग्रापापुवि/चिशा/1037/2012, दिनांक 27/03/2012 अनुसार योजनांचे पर्यवेक्षण हे कार्यकारी अभियंता, उपअभियंता, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, यांनी करावयाची आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही झालेली दिसून येत नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

8) तांत्रिक मंजूरी आदेश क्रमांक जिपऊ/ग्रापापुवि/चिशा/1037/2012, दिनांक 27/03/2012 अनुसार योजनांचे प्रत्यक्ष बांधकामाची सुरुवात करण्यापूर्वी बांधकाम साहित्याची चाचणी करुन घेणे तसेच कार्यप्रवण सर्वेक्षण करणे आवश्यक असतांना अभिलेख्यावरुन याबाबत कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**3.534 मौजे नारंगवाडी, तालुका उमरगा येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध कुटूंबांना वैयक्तिक स्वतंत्र नळजोडणी पाणी पुरवठा सुविधा उपलब्ध करुन देणे खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबादचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाच्या लेखापरिक्षणा मध्ये महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी पाणीपुरवठा व स्वच्छता योजनांतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध कुटूंबाना शौचालये व वैयक्तिक नळजोडणी व तदनुषंगिक कामावर रुपये 5,72,193/- खर्च करण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मोजमाप पुस्तिका क्रमांक 1096 पान क्रमांक 37 ते 54 वर मुल्यांकन व इतर सर्व नोंदी नमुद आहेत असे संचिकेतील अभिलेख्यावरुन दिसुन येते पण मोजमाप पुस्तिका क्रमांक 1096 लेखापरिक्षणास दर्शविण्यात आली नाही. त्यामुळे झालेले मुल्यांकन, प्रदान केलेली रक्कम, व इतर सक्षम अधिकाऱ्यांनी नमुद केलेले अहवालाची सत्यता पडताळून पाहता आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन शुध्दीपत्रक, क्रमांक ग्रापाधो/1111/ प्र.क्र.156/पा.पु.07, दिनांक 08/02/2012 व महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन शुध्दीपत्रक, क्रमांक ग्रापाधो/1111/प्र.क्र.156/पा.पु.07,दिनांक 18/11/2011 अन्वये निर्देशित केल्याप्रमाणे 2 टक्के प्रकल्प व्यवस्थापन शुल्क रक्कम रुपये 24,092/- शासन जमा केले किंवा कसे त्याचप्रमाणे सदरील रक्कम कपात केलेली असेल तर ती कुठे जमा केली आहे. त्याचप्रमाणे या रक्कमेचा कोणत्या प्रकारे विनियोग केला याबाबत अभिलेख्यावरुन पडताळणी करता आली नाही.

3) सदरील काम पुर्ण झाल्याचे अभिलेख्यावरुन दिसून आले नाही. तथापि संबंधित ग्रामपंचायतीस संपूर्ण रक्कम प्रदान करणेत आल्याचे दिसून येते. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

4) निधी वितरण आदेश क्रमांक जिपऊ/ग्रापापुवि/उस्मानाबाद/लेखा/आय/3799/2013, दिनांक 26/07/2013 तसेच जावक क्रमांक ग्रापापुवि/लेखा/67/2013, दिनांक 12/11/2013 मधील निर्देशानुसार दुसऱ्या हप्त्याच्या निधीची मागणी प्रस्तावित करत असताना उर्वरित सर्व लोकवर्गणी बँक खात्यात जमा करणे आवश्यक आहे. तथापि अशा प्रकारे बँक खात्यात रककम जमा केल्याचे अभिलेख्यावरुन निदर्शनास आले नाही.

5) तांत्रिक मंजूरी आदेश क्रमांक जिपऊ/ग्रापापुवि/चिशा/1299/2013, दिनांक 30/03/2013 अनुसार योजनांचे पर्यवेक्षण हे कार्यकारी अभियंता, उपअभियंता, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, यांनी करावयाची आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही झालेली दिसून येत नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**3.535 स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत विंधन विहिरीवर विद्युतपंप बसविणे व बोअर पाडणे कामावरील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबादने सन 2014-2015 मध्ये विंधन विहिरीवर विद्युतपंप बसविणे व बोअर पाडणे कामावर रुपये 5,80,242/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 67 नुसार नमुना क्रमांक 23 मध्ये कामाची प्रगती नोंदवही ठेवणे आवश्यक आहे.

2) सदर कामाची नोंद लेखासंहिता 1968 चे नियम 197 नुसार नमुना क्रमांक 69 पूर्ण झालेल्या कामाचे नोंदवहीत घेण्यात आलेली नाही. नोंदवही पूर्ण करणे आवश्यक आहे.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषदेकडील हस्तांतरीत बांधकाम विषयक योजनांच्या अंमलबजावणीचे वेळापत्रक ठरविण्यात आलेले असून निर्धारीत वेळेनुसार प्रत्येक टप्प्याची कार्यवाही पुर्ण करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रथमत: निश्चित करावी व त्याप्रमाणे अंमलबजावणीचे विविध टप्पे मुदतीत पूर्ण करावेत, परंतु त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्रमांक जिपर.2009/प्र.क्र.180/ पंरा.8,दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी विहित प्रपत्रात कामाची माहिती दर्शविणारे फलक बसविण्यात यावेत व या माहीती फलकामध्ये कंत्राटदाराचे नाव, कार्यारंभ आदेश, कामाचा मंजुर खर्च, काम पुर्ण करावयाचा कालावधी, दोष निवारण कालावधी, या सर्वांचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. परंतू त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

5) रुपये 1,000/- बोअरवेल सर्वे चार्जेस कपात करुन पाणी निधीत जमा करण्याबाबत उपअभियंता (यांत्रिकी) यांनी देयक सादर केलेले असतांना अशी रक्कम कपात करुन पाणी निधीत जमा करण्यात आलेली नाही.

6) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापापु 1004/प्र.क्र.5/पापु-07,दिनांक 20/01/2004 नुसार ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत पिण्याच्या पाण्यासाठी घेण्यात येणारे विंधन विहिरी या जास्तीत जास्त 60 मीटर खोलीपर्यंतच घेण्यात याव्यात. 60 मीटर बोअर पाडलेले असतांना त्यापेक्षा जादा केबल, पाईप, व नायलॉन रोप कसे वापरण्यात आले व त्याची नोंद मोजमाप पुस्तकात कशी घेण्यात आली यावर कोणतेच

अभिप्राय देण्यात आलेले नाहीत. विभागाकडे रिग मशीन असतांना व त्यासाठी कर्मचारी नियुक्त केलेले असतांना रिग मशीनचा वापर न केल्यामुळे विभागाचे नुकसान झालेले आहे. विभागाकडील रिग मशीनचा वापर न करणेबाबतचे प्रयोजन स्पष्ट करणे आवश्यक आहे.

**3.536 राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत निधी वितरणबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद लातूरचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षण अंतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा योजनेतून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमा अंतर्गत निधी 55 ग्रामपंचायतीस रुपये 6,88,53,408/- वितरण केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत**.**

1) ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी सुधारीत मार्गदर्शक सुचना बाबत पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापापु-1019/प्रक्र.104(अ)/पापु-07, दिनांक 17/03/2010 नुसार योजनेच्या अंमलबजावणीची सर्व रुपरेषा स्पष्ट केलेली आहे. सदरील शासन निर्णयातीली अनु. क्रमांक 1.9 नुसार सदरील योजनेचे काम मंजूर करताना मागील तीन वर्षात टँकर्सद्वारे पाणीपूरवठा केलेल्या गावाना प्राधान्य देण्याचे स्पष्ट केलेले आहे. तसेच अनुक्रमांक 2.1 नुसार योजनाच्या गाव कृती आराखडयास व अंदाजपत्रकास ग्रामसभेच्या ठराव पारीत झाल्यावर सक्षम प्राधिकरणानी अगोदर तांत्रीक व नंतर प्रशासकीय मान्यता दयावी असे स्पष्ट लिहले आहे.

2) ग्रामीण पाणीपुरवठा योजना अंतर्गत योजना अंमलबजावणी करताना अनुक्रमांक 7.2 नुसार ज्या गावात प्रादेशिक योजना किंवा स्वतंत्र योजना अस्तित्वात आहे परंतु पाणीपट्टी वसुली न झाल्यामुळे ती बंद आहे त्या गावाकरिता नवीन योजना मंजूर करता येणार नाही. तसेच अनुक्रमांक 11 नुसार निधी वितरण करताना 10 टक्के लोकवर्गणी जमा केल्यानंतर शासन निधी प्रथम हप्त्याची रक्कम योजनेच्या कामासाठी प्रदान करण्याविषयी स्पष्ट केलेली आहे. यात पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक ग्रा.पं.यो.1109/प्र.क्र.104(अ) पापु-07,दिनांक 30/08/2010 नुसार सर्वसाधारण क्षेत्रासाठी किमान 5 टक्के लोकसहभागाची रोख रक्कम पाणीपुरवठा स्वच्छता व पर्यावरण समितीच्या खात्यावर रोखीने जमा केल्यानंतर शासन सहभागाच्या रक्कमेपैकी 30 टक्के निधी पहिला हप्ता म्हणून समितीच्या खात्यावर जमा करण्यात येईल.

3) उपरोक्त अनुक्रमांक 1 मधील नमुद शासन निर्णयातील अनुक्रमांक 1.9 नुसार राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत निवडलेल्या सर्व ग्रामपंचायतीना सदरील योजनेच्या अंमलबाजीवणीच्या निकषानुसार प्राधान्य क्रम दिले बाबत लेखापरीक्षणात कागदपत्रा अभावी खात्री करता आली नाही. योजनेची अंमलबाजावणी ही टँकर्स मुक्त गावात केल्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत कागदोपत्री खुलासा होणे आवश्यक आहे व योजनामागील तीन वर्षात ज्या गावांना पाणीपुरवठा हा टँकर्सने झालेला आहे अशी गावे या योजनेत घेतल्याची कागदोपत्री खात्री पटवावी. तसेच उपरोक्त 1 मध्ये नमुद शासन निर्णयातील अनुक्रमांक 2.1 नुसार योजनेच्या गाव कृती आराखडयास व अंदाजपत्रकास ग्रामसभेचा ठराव पारीत झाल्यावर सक्षम प्राधिकरणाची प्रथमत: तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतू संबंधित कार्यालयांनी प्रशासकीय मान्यता प्रथम घेऊन शासन निर्णयतील तरतूदीचे उल्लघंन केलेले आहे.

4) उपरोक्त अनुक्रमांक 1 मधील शासन निर्णयातील अनुक्रमांक 2 च्या 7.2 नुसार योजनेच्या अंमलबाजवणीच्या वेळी सदरील योजना ही संबंधित ग्रामपंचायतीस देताना ज्या गावात प्रादेशिक योजना किंवा स्वतंत्र योजना अस्तीत्वात आहे परंतू पाणीपट्टीची वसूली न झाल्यामुळे ती योजना चालू / बंद असल्याबाबतचे कुठलेही कागदपत्रे लेखा परीक्षणदरम्यान निदर्शनास आले नाहीत. म्हणून अशा स्वरुपाची योजना अस्तीत्वात असतानाही ग्रामीण पाणीपुरवठा योजना संबंधित ग्रामपंचायतीस सदरील योजनेचा लाभ दिल्याचे लेखापरीक्षणास निदर्शनास येते.

5) ग्रामपंचायतींची निवड राष्ट्रीय पेयजल कायक्रम योजना अंतर्गत निवड झालेली आहे. याबाबत संबंधित ग्रामपंचायतीची निवड झाले बाबत कागदपत्राच्या आधारे खात्री पटवावी. तसेच ग्रामपंचायतीना प्रथम हप्ता लोकसहभागाची रक्कम जमा नसताना प्रदान केल्याबाबत कागदोपत्री खात्री पटवावी.

**3.537 महाराष्ट्र राज्य सुवर्ण महोत्सवी वर्षा निमित्त वैयक्तीक शौचालय व नळजोडणी सुविधाबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** जिल्हा परिषद, लातूर. अंतर्गत पाणीपुरवठा विभागाचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करताना रक्कम रुपये 7,32,463/- चा खर्च नोंदविण्यात आलेला आहे. याबात खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील कुटूंबांना खाजगी नळजोडणी व वैयक्तीक शौचालय सुविधा उपलब्ध करुन घेण्यासाठी महाराष्ट्र सुवर्णमहोत्सवी ग्रामीण दलित वस्ती पाणीपुरवठा व स्वच्छता योजना राबविण्याबाबत केंद्र शासनाकडुन राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमा अतंर्गत ग्रामीण पाणीपुरवठा व संपुर्ण स्वच्छता कार्यक्रमा अंतर्गत राज्याच्या ग्रामीण भागामध्ये खाजगी नळजोडणी व शौचालय बांधण्यासाठी प्रोत्साहनपर अनुदान दिले जाते. या संदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रमांक ग्रापायो-111/प्र.क्र.156/पापु 07, दिनांक 18/11/2011 मध्ये योजनेच्या अंमलबजावणीची रुपरेषा स्पष्ट केलेली आहे. त्यानुसार कार्यवाही केले बाबतचे लेखे लेखापरीक्षणात संचिके सोबत पहावयास मिळाले नसल्याने योजनेची अंमलबजावणी शासन निर्णय प्रमाणे झाल्याची सत्यता पडताळणी करता आली नाही. याबाबत लेख्याआधारे खात्री पटवावी.

2) उपरोक्त नमुद शासन निर्णयातील अनुक्रमांक 8 व 9 नुसार नमुद स्तरावरील तांत्रिक मान्यता दिल्यावरच संबंधित ग्रामपंचायतीची प्रशासकीय मान्यता घेणे गरजेचे आहे. ग्रामपंचायतची संचिका तपासली असता प्रशासकीय मान्यतेनंतर तांत्रिक मान्यता घेतल्याचे निर्देशनास आले याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

3) उपरोक्त नमुद शासन निर्णयातील अनुक्रमांक 10 नुसार ग्रामपंचायतीने प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग यांचेकडे सादर केल्यानंतर अनुदान मागणी कार्यकारी अभियंता यानी शासनाकडे दरवर्षी दिनांक 31 ऑगस्ट व 31 डिसेंबर अशा दोन टप्प्यात सादर करावी. असे स्पष्ट नमुद केलेले आहे. परंतू अशा प्रकारची कार्यवाही केल्याचे लेखापरीक्षणा दरम्यान कागदपत्राअभावी निदर्शनास आले नाही.